म. ग्रं. सं. ठाणे

विषय: निबंध

लेखक: विनायकराव गोविंद लिमये

सन: १८८६

संग्रहालय क्रमांक: ४३ / ७१२

पुस्तकाचें नांव: सासुरवास चांद्रिका (पूर्वभाग)

४३
सं.क्र.

# सासुरवास-चांद्रिका

(पूर्व भाग) निबंध

सन १८८६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७१२.

# सुरवास-चंद्रिका.

पुर्वभाग.

संसारसंबंधीं स्त्रियांची वागणूक आणि सासुरवासाचे प्रकार व माहिती यांसह.

गद्यपद्यात्मक.

स्त्रीशिक्षणज्ञानमाला, संसारदर्पण, कुटुंबप्रकाश, मुलाची सासरी वागणूक, स्त्रियांची मंगल कार्यें. इ० ग्रंथांचे कर्ते:—

## विनायकराव गोविंद लिमये.

यांनीं

अनेक ग्रंथाधारें प्रसिद्ध केला.

१,००० प्रती.

ता० १ माहे मार्च सन १८८६. इ.

या ग्रंथासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क
राखिले आ

सन. १८८६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७२२.

मुंबई मध्यें.
" जगमित्र प्रिंटींग " छापखान्यांत छापिलें.
[कांदेवाडी सदाशिवस्ट्रिट.]

हिंदुस्थान सरकारचा सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें सर्व प्रकारच्या मालकीचे हक्क रजिष्टर करून या ग्रंथा वरून परभाषेंत भाषांतर करणें, फेरफार करणें, किंवा पुनरावृत्ति छापणें वगैरे सर्व हक्क आह्मीं आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

# ... Chandrika.

## PART I.

Conduct of ladies in house-hold affairs, and the vexatious treatment by their mothers-in-law. In prose and poetry.

*Edited by*

NÁYAKARÀO. GOVIND. LIMAYE.

*Author of*

Strishikshana-dnána-málá, sansar darpana and other works.

*( Registered under act XXV of 1867. )*

2,000 Copies

All rights reserved

BOMBAY,

Printed at the "JUGAMITRA PRINTING PRESS"

*March 1st* 1886.

नि. सं.
२०८
नि ८३

# प्रस्तावना.

हल्लीं ‘**स्त्रीशिक्षणाकडे**’ विद्वज्जनांचें लक्ष्य बरेंच लागलें आहे व त्या प्रमाणें मोठमोठ्या शहरांतील “**मुलींस** व **स्त्रियांस**” लिहितां वाचतां येतें, ही मोठी आनंद कारक गोष्ट होय. परंतु अशा ‘**मुलींस**’ व ‘**स्त्रियांस**’ **सुबोध** व **नीतिमार्गप्रवर्तक** असे **ग्रंथ** वाचावयास फारसे मिळत नाहींत. तेव्हां ही उणीव अंशतः तरी दूर व्हावी, असें मनांत आणून, आह्मीं ही “**सासुरवासचंद्रिका**” तयार करून आमच्या **तरुण देशबांधवांच्या, भगिनींच्या** आणि **विद्वज्जनांच्या** पुढें ठेविली आहे.

ह्यांत आमच्या **आर्यवर्गांत** अत्यंत लोकमान्य आणि विख्यात अशा **मनुस्मृतींतील वेंचे**, आणि अनेक कुटुंबांत झालेल्या **सासुरवासाचें** वर्णन केलें आहे.

“ **स्त्रियांचीं कर्तव्यकर्में** व **वर्तन** ह्या संबंधीं निवडक **श्लोक सार्थ** आणि **विशेष** माहितीस्तव **स्त्रियांनीं गृहकृत्यें** कशीं करावीं, **पतीशीं, कुटुंबांतील माणसांशीं** आणि इतर लोकांशीं **संसारांत** कसें वागावें व ह्या **संसार समुद्रांतून** अनायासें पार उतरून **पतिसह** पैलतीरीं कोणत्या रितीनें तरून जावें? ह्या विषयीं सयुक्तिक व हुबेहुब अशा प्रकाराचें वर्णन केलें आहे.”

आमच्या लोकांत ‘ **सासवा** ’ ‘ **सुनां** ’ बरोबर कशा वागतात? त्या प्रत्यक्ष आपल्या **मुलीं** बरोबर कोणत्या प्रकारानें वर्तन ठेवितात? त्याच प्रमाणें, **मुलीचा** प्रतिपाळ किती आस्थेनें करितात आणि **सुनां** बद्दल किती

बेपर्वा असतात? तशीच, मुलीहून सून लहान असली तरी अविचारानें त्या सुनेवर कसकसे विलक्षण प्रसंग आणितात, आणि त्या पासून दंपत्यांत कसा बिघड पडतो? इत्यादि प्रकार तर फारच चटकदार दाखविले आहेत.

“सासूच्या जाचामुळें संसार कसे बिघडतात, व त्या पासून कुटुंबांतील सर्व मनुष्यांस कसा त्रास भोगावा लागतो, ह्या विषयीं तर हें पुस्तक वाचतांच कळून येईल. तेव्हां अशा सर्वोपयोगी पुस्तकाचा प्रत्येक कुटुंबांतील प्रत्येक स्त्रीनें संग्रह करणें अवश्य आहे. कारण ह्याच्या वाचना पासून स्त्रियांस बुद्धि, ज्ञान, चातुर्य, सारासार विचार, दूरदर्शीपणा, घरसंसार चालविण्याची हातोटी, कुटुंबांत एकोपा राखण्याची युक्ति, इत्यादि गुणांचें ज्ञान अवश्य होणार आहे, तर तें करून देणें कोणत्या देशहितचिंतकास आवडणार नाहीं बरें! असो. ह्या पुस्तकांत कोणत्याही प्रकारची विद्वत्ता, ऐट, किंवा नखरा न दाखवितां प्रांजलपणानें लोक स्थितींतील दुर्वृत्ते मात्र दाखविली आहे; हें मर्मज्ञ वाचकांस कळून येईल. यांतील विचार दूर दृष्टीचे व सौजन्याचे आहेत हें वेगळें सांगायाला नकोच.

“स्त्रिया विद्या शिकून बिघडतात, दुर्गुणी होतात व दुष्ट मार्गास लागतात; असा आमच्यांतील कित्येक जुन्या लोकांचा समज आहे, तो बदलावा, असें मनांत आणून हा “चंद्रिकारूप पेला” सुजनां पुढें ठेविला आहे; तर त्याचें आस्वादन करून रुची घेण्याबद्दल सर्वांस सविनय प्रार्थना आहे.”



स्त्रियांची गृहकृत्यें कशीं असतात, व त्या कोणत्या प्रकारानें वागतात, आणि त्यांची ती वागणुक योग्य आहे किंवा अयोग्य आहे? ह्या गोष्टींचें यथामति पूर्णपणें विवेचन ह्या पुस्तकांत केलें आहे. बांधव आणि बहिणींनों, खरोखर स्त्री शिक्षणास जे विषय योग्य दिसले ते शोधून व त्या कामीं उपयुक्त असे विषय लिहून आमच्या स्त्री वाचकां करितां हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचा आमचा हेतु काय आहे हें निराळें सांगायाला नकोच.

आमचे परमपूज्य व पितृतुल्य ज्येष्ट बंधु कैलासवासी ती० रा० रा० कृष्णराव गोविंद उर्फ अण्णा साहेब लिमये. ह्यांस अशा विषयांवर लिहिण्याची फार हौस असे, यांतील बराच भाग त्यांनीं लिहिलेला आहे.

ह्या पुस्तकाचा पूर्व भाग व उत्तर भाग असे दोन भाग केले आहेत. असें करण्याचें कारण—हें सर्वत्रांस थोडक्या किंमतीस मिळावें. याचा उत्तर भागही छापून तयार आहे.

या पुस्तकांत संगीत प्रिय लोकां करितां संगीताच्या चालींवर अनेक मनोरंजक पद्यें दिलीं आहेत.

VINAYAKRAW GOVINDRAW LIMAY,

*Author.*

*Girgam Bombay March* 1st 1886.

# उद्देश.

कोणत्याही कामास आरंभ करण्याचे पूर्वी त्या बाबतींत आपले विचार व्यक्त करून दाखविण्याचा जो पूर्वापार संप्रदाय आहे, त्याप्रमाणें चार शब्द खालीं लिहिले आहेत.

भारतवर्षांतील अबलाजनांची सांप्रत जी निकृष्टावस्था झाली आहे, ती पाहतां खरोखर सहृदय मनुष्याचें अंत:करण कळवळल्यावांचून राहणार नाहीं. कारण ज्या स्त्रीवर्गास आपले महाज्ञानी व त्रिकालज्ञ पूर्वज देवाप्रमाणें मान देत असत, व ज्या आपल्या विद्वत्तेनें आणि चातुर्यानें महाजनसमुदायांत प्रशंसनीय व पूज्य मानल्या जात असत; त्यांची उकिरड्यांत पडलेल्या रत्नाप्रमाणें अवस्था व्हावी, ही किती शोचनीय गोष्ट आहे बरें? ज्या पूर्वी सृष्ट्युत्पत्तीस कारणीभूत मानल्या जात असत, त्यांसच आलीकडे सुज्ञ म्हणविणारे दुराग्रहानें केवळ भोगांगना मानून त्यांच्याशीं व्यवहार करतात, ही किती दु:खाची गोष्ट बरें!

आम्हीं अनेक कुटुंबें पाहिलीं, त्यांत सुनांवर जो कहर उडत असतो, त्याची कल्पना देखील करणें मोठें कठीण आहे. काय सांगावें! सून कितीही लहान असो, सासवा तिला मोलकरणी प्रमाणें मानून वागवितात; त्यांजकडून मुलांबाळांचें उष्टें खाववितात; आणि स्वप्नांतही न येणारे कष्ट त्यांच्याकडून करवितात. ह्या कृत्याला नि:पक्षपातित्व असें कोण म्हणेल? जी पुत्राप्रमाणें मान्य, जिच्यावर पुढें होणाऱ्या संततीची प्रतिष्ठा, तिलाच जर दासीप्रमाणें वागविलें, तर पुढील संतती कशी निपजेल, ह्या विषयीं कोणाएकाच्याही मनांत येत नाहीं, हें आहे तरी काय? असो, सासूकडून सुनेला जो त्रास भोगावा लागतो, तो फारच दु:सह असतो.

ह्या सुनांस गांजण्याचा प्रकार आपल्याच देशांत आहे, त्यांनां मारणें, त्यांजकडून दुस्तर कामें करविणें, आणि जसें एखादें टाकाऊ जनावर असतें, त्याप्रमाणें त्यांनां मानणें, हें कोणाला ठाऊक नाहीं काय? जो सासू आणि सून ह्यांची वागणुक चार दिवस पाहील, त्याला हें सर्व कळून येईल.

संसार कसा करावा? स्वजनांशीं कसें वागावें? वडील, आप्तसंबंधी यांस कसा मान द्यावा? आणि पतीवर कोणत्या प्रकारें प्रेम



ठेवून त्याला कोणत्या प्रकारचा मान द्यावा? इत्यादि अनेक प्रकार आम्हीं पुढें पुस्तकांत व्यक्त करून दाखविले आहेत. ते वाचून त्यांच्या ओघाप्रमाणें चालणारी सून किंवा सासू, पुढें आपल्या सुनेस गांजणार नाहीं, अशी आमची खात्री आहे.

पूर्वकालच्या स्त्रिया आपल्या ज्ञानानें व साहाजिक आचरणानें निंद्यकर्मापासून आपापल्या पतींसही परावृत्त करीत असत, असें ग्रंथांतरीं आढळतें. पण सांप्रतच्या स्त्रियांस तें ज्ञान नाहीं; आणि नसण्याचें कारण त्यांची अज्ञान स्थिति आणि अल्पवयांत त्यांस होणारा जाच हें होय. जर सासवा सुनेला आपल्या मुलीप्रमाणें वागवितील तर त्यांजपासून त्यांस वार्धक्यांत सौख्य होणार नाहीं काय? अवश्य होईल. प्रेमाचा मोबदला त्यांनां मिळाल्यावांचून राहणार नाहीं. पण ह्या गोष्टी व्हाव्या कशा? जर मुळापासूनच अज्ञानाचें आवरण आहे, तर पुढील सर्व आशा व्यर्थ आहेत. आमचें पुस्तक जी स्त्री वाचील तिला कुटुंबांतील मनुष्यांशीं वागणुक कशी ठेवावी हें अवश्य कळेल, त्याचप्रमाणें जी नित्य मनन करील ती पूर्वकाळच्या स्त्रियांची योग्यता पावेल ह्यांत संशय नाहीं, हें पुस्तक लिहिण्याचा मूळ हेतु स्त्रियांवर येणारे अनेक प्रसंग पाहणें हाच होय.

वाचकहो, आपल्या देशांतील स्त्रियांची वागणुक सर्वस्वी पाश्चिमात्य स्त्रियांप्रमाणें व्हावी, असा आमचा अगदीं हेतु नाहीं, तर आपल्या देशावर वारंवार परचक्राचीं संकटें येत गेल्यामुळें निरुपायास्तव स्त्रियांचे जे हक्क नाहींसे झाल्याप्रमाणें झाले आहेत, ते त्यांस मिळावे आणि संसारांत सर्वत्र शांतता उत्पन्न व्हावी, हाच आहे. तो अंशत: जरी पूर्ण झाला, तरी आम्हीं कृतकार्य झालों, असें मानावयास अडचण पडणार नाहीं. शेवटीं जगन्नियंत्या जगदीश्वराजवळ आमची अशी प्रार्थना आहे कीं, त्यानेंच दयाळू होऊन आमच्या स्त्रीसमाजांत सद्बुद्धीची प्रेरणा करून त्यांस सुखी करावें.

*Vinaykraw Govindraw Limay.*

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| १ परमेश्वराची प्रार्थना. .... .... | १ |
| भाग पहिला. | |
| २ पातिव्रत्य व स्त्रिशिक्षण. .... .... | २—११ |
| ३ स्त्रियांचा मुख्य धर्म. .... .... | १२—१६ |
| भाग दुसरा. | |
| ४ स्त्रियांचे अलंकार. .... .... | १७—२९ |
| भाग तिसरा. | |
| ५ संसार व त्यांतील स्त्रीपुरुषांची वागणूक. | ३०—४१ |
| भाग चवथा. | |
| ६ स्त्रियांची सुधारणा. .... .... | ४२—४९ |
| भाग पांचवा. | |
| ७ सासर आणि माहेर. .... .... | ५०—६० |


---


विक्रीस तयार आहेत.

**स्त्रियांची योग्यता व पातिव्रत्य वाढविणारीं पुस्तकें विद्वानांनीं पसंत केलेलीं.**

स्त्रिशिक्षण विषयक. मु. कीं. ट. ख

आणे आणे

१ स्त्रिशिक्षण ज्ञान माला. .... .... १२—२

२ सासू व सून यांचा वृत्तांत. .... .... १२—२





४ सासुरवास—चंद्रिका पुर्वभाग .... ८—१

५ संसारदर्पण. .... .... १०—२

६ मुलींची सासरीं वागणुक. आणि संगीत "कन्या विक्रय" व त्याचा परिणाम. ६—१

७ स्त्रियांचीं मंगल कार्यें. अथवा. "डोहळे जेवण" आणि "हळदकुंकु." ५—१

८ स्त्रियांचे नेत्र कटाक्ष. .... .... ३—१

**मनोरंजक प्रहसनें.**

१ तरुणबायको आणि म्हातारा नवरा. ४—१

२ पुरुषोत्तम आणि सावित्री. .... .... ३—१

**इतिहास.**

१ कुर्ग प्रांताचा खरा इतिहास. .... ६—१

हीं सर्व पुस्तकें खालीं सही करणाराकडे रोख किंमत पाठविली असतां विकत मिळतील.

VINAYEKRAW GOVINDRAW,
Girgaum Back Road Bombay.

# सासुरवास--चंद्रिका.

## परमेश्वराची प्रार्थना.

अंबाबाईची स्तुति.

( पद राग--खमाज--ताल धुमाळी. )

पंचतुंड नररुंड मालधर, या चालीवर.

हे जगदंबे आदिभवानी महिषमर्दिनी तुज स्तवुनी ॥ विनती करितों मान्य करी तूं, उभयकरा प्रति जोडूनी ॥धृ.॥ ग्रंथ रचाया नाद लागला जो या दासालागोनी ॥ फलद तयासी केलें माते साह्य सदा त्वां होऊनी ॥ १ ॥श्वशुरवास चंद्रिका रचुनी अर्पितसें मी या सुजनीं ॥ लीन दीन मी बुद्धि हीन गे रिझवी लोकांवाक्सुमनीं ॥ २ ॥ सकल विघ्ननग भग्न कराया तत्पर अससी हे जननी ॥ गोविंदाचा पुत्र विनायक लीन असे गे तव चरणीं ॥ ३ ॥

# सासुरवास--चंद्रिका.

अथवा

सासूसुनेचें वर्तन, कजाग सासूपासून सुनेस होणारा त्रास व संसाराची हानि. नणंदे पासून सुनेस होणारा त्रास आणि त्यांच्या वर्तणुकी मुळें होत असलेला प्रकार.

भाग पहिला.

## पातिव्रत्य व स्त्रीशिक्षण.

( पद राग--कालंगडा--ताल--धुमाळी. )

अष्ट मूर्ति परमेश सदाशिव, या चालीवर.

**पतिव्रतेचा धर्म या जगीं सकल जनां सुखवो ॥**
**सफल हेतु हा मनिंचा व्हाया स्त्रीशिक्षण होवो ॥ धृ ॥**
**संसारीं या पतिविण नसतें दैवत तें जाणा ॥ मूढा**
**अबला तें न समजुनी भजती गुरुराणा ॥ पातिव्रत्या-**
**वि मुख होउनी भजती पाषाणा ॥ ह्मणुनी शिक्षण**
**मिळुनी सांचें तम सारें जावो ॥ १**

**पतिव्रता धर्माचें** मुख्य बीज ह्मटलें ह्मणजे **" स्त्री पुरुषांतील निष्कपट प्रेम होय. "** तेव्हां तें जिला समजलें नाहीं, अशा स्त्रियेच्या हातून तो धर्म कधींही पाळला जात नाहीं. जगांतील खऱ्या व अवश्य गोष्टींपेक्षां बाह्यावडंबर घातलेल्या ढोंगी लोकांच्या कृत्यांवर अशिक्षित लोकांची श्रद्धा व भक्ति विशेष जडते. तशांतून प्रस्तूत **स्त्रियांची** स्थिति पाहिली तर अशिक्षितपणाविषयीं त्या उपमेय पदधारी बनलेल्या आहेत, तेव्हां त्यांस आपला धर्म समजावा कसा? वास्तविक पाहतां **स्त्रियांस** पतिवांचून अन्य देवतांची उपासना करणें व अन्य गुरूचा उपदेश घेणें, यास मुळींच शास्त्रसंमति नाहीं. असें असतां कित्येक भाविक **स्त्रिया** गुरुभक्तीविषयीं इतक्या त-



ल्लीन झालेल्या आढळतात कीं, गुरु दर्शना पुढें किंवा गुरूचे आज्ञे पुढें **पति** ह्मणजे कांहींच नाहीं असें त्यांस वाटतें. याचें कारण त्यांच्या मनाची वेडगळ श्रद्धा व अज्ञान होय. आमच्या **स्त्रियांची** जी इतकी वाईट स्थिति झाली आहे, याचें कारण पाहूं लागलें असतां धर्माविषयीं त्यांच्या मनाची अज्ञान मूलक भलतीच श्रद्धा होय. ईश्वर भावनेविषयीं त्यांची अशी कांहीं चमत्कारिक समजूत होऊन गेली आहे कीं, सगुण भक्तीचा प्रकार त्यांच्यांत परंपरया वाढून तो खऱ्या हेतु पासून फारच दूर जाऊन, त्यापासून परमेश्वराविषयीं उलट जास्त अज्ञान त्यांच्यांत वाढत चाललें आहे.

ईश्वरीतेजाचें व गुणाचें अधिष्ठान ह्मणून कल्पिलेली किंवा मानिलेली जी मूर्ति, किंवा एखाद्या साकार वस्तूच्याच ठिकाणीं ईश्वरत्व मानून खऱ्या प्रभूविषयीं गैरमाहित असे जे भक्त, त्यांच्याहूनही **स्त्रियांची** कमाल झाली आहे. **स्त्रियांची** साकार व सगुण पदार्थावरील भक्ति ह्मणजे ईश्वराच्या मूर्तिपूजेचा प्रकार, मूळच्या मुद्याला सोडून काल्पनिक व असंभवनीय तेज ज्यांचे अंगीं आहे; अशीं **ह्मसोबा, काळकाई,** वगैरे पिशाचेंच ढोंगी लोकांनीं त्यांचीं आराध्य दैवतें बनविलीं; यामुळें बिचाऱ्या भोळ्या **स्त्रियांवर** एखादें साहजिक संकट आलें कीं, पहिला नवस **ह्मसोबास!!**

दगडास चुना शेंदूर थापला, कीं **स्त्रियांच्या**

बुद्धीनें त्या दगडाचे ठिकाणीं **देवत्व** आलेंच. मग लाग-ल्याच त्याला नवस आणि सायास करावयास, पण उप-योग काय? धोंडा तो धोंडाच. **स्त्रियांच्या** या वेडगळ भ-क्तीनें तो बोलणार कोठून? बरें, जर '**स्त्रियांच्या**' **नवसा-ला** तो न पावला, तर त्यांची भक्ति त्याजवर बसाणार कशी? व भक्तींच जडली नाहीं ह्मणजे हें ढोंग उत्पन्न करणारांची पोळी पिकणार कशी? तेव्हां ढोंगी लोकांनीं तो दगड आ-पलेच अंगांत खेळविण्याची युक्ति काढून लागले **डोकें** हालवायाला. या प्रमाणें छां छूं चें जरा वारें दृष्टीस पडलें कीं, तो दगड सोडून **स्त्रिया** त्या भक्ताचेच नादीं लागतात. मग काय, तो बोलका देव. साधलेलालाग सोडतो कशाला? शिव शिव!! ज्या **पुरुषांनीं स्त्रियांस** सन्मार्गाचा व सत्कृत्या-चा बोध करावयाचा त्यांनीं त्यांस असें उलट ढोंग मातवून अनीतीचे मार्गास लावून अज्ञानांधःकारांत लोटावें, या सारखें काळतोंड्या ढोंग्यांस दुसरें लाजीरवाणें तें काय आहे! **स्त्रियांच्या** या वेडगळ भक्तीचा प्रकार वाढतां वाढतां शेवटीं **दगडधोंड्यांस, वडपिंपळांस** व साधारण झाडपाल्याचे मुळांस देखील त्या देव मानूं लागल्या आहेत. **स्त्रियांवर** एखादें अरिष्ट आलें कीं शेंकडों नवस; मनासारखी एखादी गोष्ट झाली नाहीं, कीं नवस; एखाद्या गोष्टीची इच्छा झाली, कीं त्याच्या सिद्धी करितां **सर्व यत्न सोडून** प्रथम नवस; मिळून कांहीं झालें कीं, अगोदर नवसा-



शीं गांठ; तेव्हां **स्त्रियांच्या** अशा समजुतीनें मुख्य आराध्य दैवत, शास्त्रमान्य ईश्वर, व सर्व इच्छा तृप्त करण्या विषयीं प्राणापलीकडे संकटें भोगणारा जो **पति**; त्याचें खरें महत्व व खरा उपयोग **स्त्रियांस** न समजल्यामुळें त्या संसारसु-खाला आंचवून **सनातन** व **पवित्र धर्म** जें **पातिव्रत्य** त्या पासून भ्रष्ट होतात. आणि हे वेडगळ नवस व सायास के-ल्यापासून कांहीं उपयोग न होतां त्या शेवटीं पस्ताव्यांत पडतात. जर **दगडधोंड्यांस** व **झाडामुळांस** नवस **करून मुलें बाळें** होतीं, किंवा **संसार** सुखें प्राप्त होत अ-सती, तर या विवाहादि प्रापंचिक घडामोडींची जरूर लागतीना. **तुकाराम बुवांनीं ह्मटलें आहे:—**

**" नवसें कन्यापुत्र होती। तरिकां करणें लागे पति "**

सुशिक्षेपासून त्यांच्या अंगीं ज्ञान आलें ह्मणजे खरें खोटें समजणें हा त्या ज्ञानाचा गुणच असल्यामुळें स्त्रियांस आपलें कर्तव्य समजूं लागून ढोंगाच्या जाळ्यांत त्या सांपडणार नाहींत. परंतु त्यांस सुशिक्षण देणें हें काम प्रस्तुतस्थितीचे मा-नानें पाहतां विवाहित **स्त्रियां**विषयीं त्यांच्या **पतीचें** व **अविवाहित कन्यकां** विषयीं त्यांच्या **आईबापांचे** शिराव-र पूर्णपणें अवलंबून आहे. ह्मणजे असें ह्मणतां येईल कीं, सांप्रत **स्त्रियांच्या हातून पातिव्रत्याच्या** अज्ञानपणामुळें जे दोष घडतात त्याजबद्दल पुरुषच अपराधी आहेत. कारण **स्त्रिया** ह्या स्वतंत्र नसून बहुतांशीं **पुरुषांचे** स्वाधीन

आहेत असें आपण मानतों, तर त्यांस सन्मार्गास लावणें हें पुरुषांचें कर्तव्य नव्हे काय?

**स्त्रियांनीं पतिव्रताधर्मानें** चालावें हें त्यांस व त्यांच्या **पतींसही** सुखावह आणि भूषणास्पद असल्यामुळें आणि ऐहिक सुख हेंही स्त्रियांच्या ह्याच धर्मावर अवलंबून असल्यामुळें तो धर्म स्त्रियांचे अंगीं पूर्णपणें आविर्भूत असला पाहिजे; व यास प्राधान्य उपाय ह्मटला ह्मणजे सुशिक्षण होय. तेव्हां **संसार** सुखाची इच्छा करणारांनीं या गोष्टीकडे अवश्य लक्ष्य दिलें पाहिजे.

**पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांनाही विद्येची आवश्यकता आहे.** आपल्या या देशाच्या अति ऊर्जित दशेमध्यें, ह्मणजे ज्याला **पौराणिक**काल ह्मणण्याचा सांप्रदाय आहे, त्या वेळीं **स्त्रिया** व **पुरुष** फार विद्वान् असून आपल्या जाज्वलित विद्यातेजानें त्यांनीं केलेल्या ग्रंथांच्या आज्ञा, एखाद्या नीतिमान् **राजा** प्रमाणें लोक शिरसामान्य करीत आहेत.

कालचक्राचे नियमानें या भरतखंडाची ती ऊर्जित दशा जाऊन हरएक वैभवास व ऐश्वर्यास उतरती कळा लागून दिवसें दिवस ज्ञानाचे मार्गही बंद पडले. तेव्हां लोक अज्ञानी होऊन आपले खरे हक्क व खरीं कर्तव्यें यांस विसरून दुसऱ्याचा **दासपणा** व **गुलामगिरी** करण्याची त्यांस संवय लागली. परस्परांतील स्नेहभाव व प्रीति यांचा ऱ्हास होऊन जिकडेतिकडे कलागती व वैमनस्यें फार वाढत चाललीं



अशा स्थितीमध्यें एतद्देशीय लोकांचे जे प्रतिस्पर्धी त्यास वेळ साधून त्यांनीं त्यांस पादाक्रांत केलें. आणि आपसांत तंटे लावून देऊन आपल्या शौर्यानें व पराक्रमानें त्यांस अगदीं जर्जर करून संपूर्ण आपली सत्ता बसविली.

आमच्या देशाचें कमी कमी होत येणारें वैभव समूळ नाहींसें करण्यास, व आमचा धर्म, आमच्या रीतीभाती, आमची विद्या आणि आमचें ऐक्य, यांचा समूळ नाश करणारे प्रतिस्पर्धी ह्मटले ह्मणजे '**यवन.**' या **यवनां**प्रमाणेंच '**पोर्तुगाल**' देशच्या लोकांनींही या देशच्या बऱ्याच भागास अतिशय गांजलें होतें. त्यांचीं उदाहरणें प्रस्तुत **गोवें, दमण** वगैरे ठिकाणीं पुष्कळ आहेत. त्यांनीं या देशांतील लोकांस धर्मभ्रष्ट करून अनेक तऱ्हेनें त्रास दिला. धर्मसंबंधानें त्यांनीं बाटविलेले लोक, ज्यांना '**किरिस्तांव**' असें ह्मणतात, त्यांची संख्या प्रस्तुत बरीच वाढली आहे. आलीकडे या धर्मभ्रष्ट लोकांची अशी स्थिति झाली आहे कीं, त्यांनीं स्वीकारलेल्या नवीन पंथासच तो पिढीजादा असें ते समजूं लागले आहेत.

फार प्राचीन काळापासून त्यांच्या ठिकाणीं जडलेल्या रीति या धर्माचे वेषांतरांतही त्यांच्या ठिकाणीं दृष्टीस पडतात.

पुढें **यवनांनीं** देखील हाच प्रकार आरंभिला. त्यांनीं तर या देशांतील लोकांवर धर्मसंबंधानें जे जुलूम केले आहेत ते ऐकून आंगावर कांटाच उभा राहतो, तेव्हां अशा

ऐन आणीबाणीचे प्रसगांत लोक सांपडून वित्ताची व जी विताची अगदीं आशा सुटल्यामुळें कित्येकांनीं आपल्या प्राणाच्याही आहुती दिल्या. मिळून या भयंकर जुलुमानें आणि धर्मभ्रष्टपणानें देश उजाड होऊन कोणी संरक्षण करणाराच राहिला नाहीं. ज्यानें उठावें त्यानें " **काढ शेंडी आणि कर मुसलमान** " असा अंमल चालवावा. असाच प्रकार सर्वत्र सुरू झाला, तेव्हां कसली विद्या आणि कसलें ज्ञान!! अब्रूनें ओली कोरडी भाकर मिळण्याची आणि असलेली स्थिति कायम राहण्याचींच जर अशाश्वती, तर मग **शिक्षण** आणि **सुधारणा** यांना जागा कोठून मिळणार!! आतां **पुरुषांची** जर ही स्थिति, तर बिचाऱ्या **अबलांस** कोण पुसतो? **यवनांनीं** या संबंधानेंही फारच वाईट गोष्टी केल्या. लढाईंत किंवा लुटींत हातीं लागलेल्या बायकांची ते इतर जंगम मिळकतीसारखी वांटणीं करीत असत. अशा भयंकर स्थितींत **स्त्रियांचे** हक्क आणि त्यांची योग्यता यांचा विचार करीत बसतो कोण?

अशा प्रकारचा अतिशोकास्पद, भयंकर, व दुःखकारक जो काळ, तो जाऊन पुढें आमच्या देशांतील शूर शिपायांनीं पुनः आपल्या विजयाचीं निशाणें फडकवून मुसलमानांची खोड मोडली; आणि देशांतील अस्वस्थता नाहींशी करून पुनः परम पवित्र अशा अनादि आर्यधर्माची स्थापना केली; त्याप्रसंगीं निर्मूळ व भ्रष्ट झालेल्या सर्व विद्या



व पुनः प्रचारांत व जागृतींत आणण्याची सुरवात झाली. एखाद्या नवीन सृष्टी प्रमाणें त्या प्रसंगीं जो तो आपला धर्म, आपला देश, आपल्या रितीभाती आणि आपले देशबांधव, हे जसे काय आपणास नवीनच प्राप्त झाले; असें समजूं लागला. ही स्थिति बरीच चांगलेपणास येऊन पुनः ती पूर्वी प्रमाणें पूर्णतेस जाऊन पोंचेल असें लोकांस वाटूं लागलें होतें. परंतु तो प्रकार फार दिवस चालला नाहीं.

धर्मसंस्थापक व शूर पुरुषांचा नाश होऊन **दिवाभीताप्रमाणें भेकड** व **मूर्ख** अशी जी पुढें त्यांची संतति आणि वंशावळी निपजत चालली, तिनें पुनः या सर्व देशास **चव-ऱ्यायशीच्या** फेऱ्यांत आणलें. त्याचा शेवटीं असा परिणाम झाला कीं, **मराठ्यांनीं** आपल्या **बाहुबळानें** व चातुर्यानें मिळविलेलें या देशाचें पूर्ण आधिपत्य नष्ट होऊन पूर्वींच्या राजकार्य धुरंधर अशा पुरुषांचे वंशजांस पराधीन व्हावें लागलें. ही स्थिति ह्मणजे इंग्रजी राज्याचा प्रारंभ. आतां या बदललेल्या स्थितींत इतकें बरें झालें कीं, इसापनीतींतील " **बेडकांचे राजासारखा** " प्रसंग आला नाहीं. इंग्रज या देशचे किंवा याच्या आसपासचे **देशील** नसून, पूर्वींच्या **यवनां** प्रमाणे बऱ्यावाईट कोणत्याही रितीचा या देशाशीं त्यांचा संबंध नव्हता. हे अगदीं परद्वीपस्थ व परधर्मी लोक असून, केवळ व्यापाराचे नात्यानें ते मोठा भगीरथ प्रयत्न करून या ' **सुवर्णभूमिकेस** '

ऐन आणीबाणीचे प्रसगांत लोक सांपडून वित्ताची व जीविताची अगदीं आशा सुटल्यामुळें कित्येकांनीं आपल्या प्राणाच्याही आहुती दिल्या. मिळून या भयंकर जुलुमानें आणि धर्मभ्रष्टपणानें देश उजाड होऊन कोणी संरक्षण करणाराच राहिला नाहीं. ज्यानें उठावें त्यानें " **काढ शेंडी आणि कर मुसलमान** " असा अंमल चालवावा. असाच प्रकार सर्वत्र सुरू झाला, तेव्हां कसली विद्या आणि कसलें ज्ञान!! अब्रूनें ओली कोरडी भाकर मिळण्याची आणि असलेली स्थिति कायम राहण्याचीच जर अशाश्वती, तर मग **शिक्षण** आणि **सुधारणा** यांनां जागा कोठून मिळणार!! आतां **पुरुषांची** जर ही स्थिति, तर बिचाऱ्या **अबलांस** कोण पुसतो? **यवनांनीं** या संबंधानेंही फारच वाईट गोष्टी केल्या. लढाईंत किंवा लुटींत हातीं लागलेल्या बायकांची ते इतर जंगम मिळकतीसारखी वांटणी करीत असत. अशा भयंकर स्थितींत **स्त्रियांचे** हक्क आणि त्यांची योग्यता यांचा विचार करीत बसतो कोण?

अशा प्रकारचा अतिशोकास्पद, भयंकर, व दुःखकारक जो काळ, तो जाऊन पुढें आमच्या देशांतील **शूर** शिपायांनीं पुनः आपल्या विजयाचीं निशाणें फडकवून मुसलमानांची खोड मोडली; आणि देशांतील अस्वस्थता नाहींशी करून पुनः परम पवित्र अशा अनादि आर्यधर्माची स्थापना केली; त्याप्रसंगीं निर्मूळ व भ्रष्ट झालेल्या सर्व विद्यां



व पुनः प्रचारांत व जागृतींत आणण्याची सुरवात झाली. एखाद्या नवीन सृष्टी प्रमाणें त्या प्रसंगीं जो तो आपला धर्म, आपला देश, आपल्या रितीभाती आणि आपले देशबांधव, हे जसे काय आपणास नवीनच प्राप्त झाले; असें समजूं लागला. ही स्थिति बरीच चांगलेपणास येऊन पुनः ती पूर्वी प्रमाणें पूर्णतेस जाऊन पोंचेल असें लोकांस वाटूं लागलें होतें. परंतु तो प्रकार फार दिवस चालला नाहीं.

धर्मसंस्थापक व शूर पुरुषांचा नाश होऊन **दिवाभीताप्रमाणें भेकड** व **मूर्ख** अशी जी पुढें त्यांची संतति आणि वंशावळी निपजत चालली, तिनें पुनः या सर्व देशास **चवव्यायशीच्या** फेऱ्यांत आणलें. त्याचा शेवटीं असा परिणाम झाला कीं, **मराठ्यांनीं** आपल्या **बाहुबळानें** व चातुर्यानें मिळविलेलें या देशाचें पूर्ण आधिपत्य नष्ट होऊन पूर्वीच्या राजकार्य धुरंधर अशा पुरुषांचे वंशजांस पराधीन व्हावें लागलें. ही स्थिति ह्मणजे इंग्रजी राज्याचा प्रारंभ. आतां या बदललेल्या स्थितींत इतकें बरें झालें कीं, इसापनीतींतील " **बेडकांचे राजासारखा** " प्रसंग आला नाहीं. इंग्रज या देशचे किंवा याच्या आसपासचे देखील नसून, पूर्वीच्या **यवनां** प्रमाणे बऱ्यावाईट कोणत्याच रितीचा या देशाशीं त्यांचा संबंध नव्हता. हे अगदीं परद्वीपस्थ व परधर्मी लोक असून, केवळ व्यापाराचे नात्यानें ते मोठा भगीरथ प्रयत्न करून या ' **सुवर्णभूमिकेस** '

झाले. पुढें कर्मधर्मसंयोगानें त्यांचा उदयकाळ येण्याची वेळ आली, तेव्हां अल्पायासानें त्यांना या देशाचें एकदम अधिपत्य प्राप्त झालें. आतां आपल्या देशाचें राज्य एकाएकीं अन्य द्वीपांतल्या व भिन्न धर्माच्या लोकांचे हातीं गेलें, हें त्या वेळच्या गतवैभव झालेल्यालोकांस बरें वाटलें नसेल हें उघड आहे, तथापि त्यांनीं सुयंत्ररितीनें जो राज्यकारभार चालविला, त्याचे योगानें एतद्देशीय लोकांचा बराच भाग बहुत संतुष्ट होऊन राहिला होता. हल्लींही त्या लोकांच्या कित्येक गोष्टी उदाहरण घेण्यासारख्या आहेत. त्यांनीं आपला अंमल बसवितांक्षणींच मुसलमान लोकांसारखी धांगडधिंगाई व त्यांचे सारखा जुलूम न करितां सर्वत्रांस योग्य रितीनें व न्यायानें वश करून घेतलें. पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांनाही विद्या व ज्ञान असणें जरूर आहे, असें जाणून व त्यांचा त्यांना समक्ष अनुभव असल्या वरून, **स्त्रियांस** शिक्षण देण्याकरितां 'मुलींच्या' शाळास्थापन केल्या. त्या करितां शेंकडों रुपये खर्च करून शिक्षकांच्या नेमणुका होऊन शिक्षणाचा क्रम सुरू झाला. आरंभी या शाळांची स्थिति फारच निराशेची होती. कारण, आमच्या वाडवडिलांच्या ऐकींव कारकीर्दीपासून तों आलीकडे बरेच दिवसांत लोकांमध्यें त्याचा प्रचार बंद पडला होता, यामुळें आरंभीं तो क्रम सुरूहोणें फारच बिकट होतें.



मुलींना शाळेंत पाठविणें हें एक लौकिकविरुद्ध व वेडेपणाचें काम आहे असा लोकांचे मनाचा त्यावेळीं ग्रह होता. परंतु पुढें दिवसें दिवस पुरुषच जास्त विद्वान् होऊन त्यांची संस्कृत वगैरे भाषेंत प्रवीणता होऊं लागली, तसें आपले हक्क व आपली योग्यता यांचें त्यांस यथातथ्य ज्ञान होऊन खरेखोटेपणा पूर्णपणें समजूं लागला. याप्रमाणें स्वतःविषयींचा विचार झाल्यावर स्त्रियांच्या स्थितीकडेही त्यांचे विचार लागले.

आपल्या पूर्वजांनीं मानिलेली स्त्रियांची योग्यता व प्रस्तुतची त्यांची स्थिति यांजबद्दल त्यांचे मनामध्यें विचार घोळूं लागून त्यांनीं ज्ञानी व्हावें असें त्यांचे अंतःकरणांत वाटूं लागलें. दिवसेंदिवस अशी त्यांचे मनाची खात्री होत चालल्यामुळें आरंभिलेल्या 'स्त्रीशिक्षणास' उत्तेजन येऊन जागोजागच्या 'मुलींच्या शाळांची' स्थिति सुधारत चालली. बहुतेक जातींतील मुली शाळेंत जाऊं लागल्या पुढें मुलींच्या शाळेवर स्त्रीशिक्षकाची योजना असावी असा विचार सरकारचे मनांत येऊन बायकांचाच एक शिक्षकवर्ग तयार केला. त्यांत बायकांस चांगलें शिक्षण देऊन विद्वान् केल्या व कित्येक मुलींचें शाळांवर शिक्षकाचे ठिकाणीं त्यांची नेमणुक करून त्यांस चांगला पगारही सरकार देतें. प्रस्तुत स्त्रीशिक्षणाचा क्रम सुरू होऊन तो बऱ्याच ऊर्जित दशेसही आला आहे.

# स्त्रियांचा मुख्य धर्म.

( पद राग--ब्याहाग--ताल--दादरा. )
नचसुंदरिकरुं कोपा, या चालीवर.

**बाईनचकरुंकोपा ॥ स्मरुनीया साजगपा ॥ भर्ता**
**ज्ञामोडुनिशिरिंआणुनकोपापा ॥ धृ० ॥ दुष्टजरीपर्**
**झाला ॥ दैवतनाअन्यतुला ॥ करुनीउपदेशाल**
**जनबळवीराजाला ॥ कुणिमारितिधेनूला ॥ होइसद**
**वत्साला ॥ तरिप्रभुतोतुजवरतीकरिलहिअनुकंपा ॥ १**

ज्या ज्या ग्रंथांमध्यें स्त्रियांचें कर्तव्य कर्मांचें विवेचन केलेलें आढळतें त्या सर्वांचा तात्पर्यार्थ शोधूं लागलें असत स्त्रियांनीं पतीच्या आज्ञेंत वागावें हाच निर्णय ठरतो, आ हा धर्म आज अनादिकालापासून चालत आलेला असल मुळेंच तो सृष्टींतील संपूर्ण **स्त्रीपुरुषजातीस** सुखाव आहे असें ह्मणावें लागतें.

स्वतंत्रतेच्या खऱ्या उपयोगा विषयीं भलतीच समजू झालेले जे कित्येक लोक आहेत, ते **स्त्रियांच्या** वरील स्थि तीस परतंत्र असे समजतात. पण ही मोठी आश्चर्या गोष्ट आहे. **पतीच्या** आज्ञेंत वागणें ही जर **स्त्रियांनी** परतंत्रता मानली, तर मग प्रजेनें राजाज्ञा मानणें हा त विहित मार्ग व प्रजेचा धर्म ह्मणतां येणार नाहीं. आ असा सिद्धांत करीत गेलें ह्मणजे कोणीच कोणास मा



नये, अशी स्थिति होऊन सृष्टीची काय व्यवस्था होईल, हें मनांत येऊन भीति वाटते.

आतां एखादा जुलमी राजा असला ह्मणजे त्याची आज्ञा मान्य करणें जसें प्रजेला सुखावह होत नाहीं; त्याच प्रमाणें **मूर्ख, क्रूर, व निर्दय** पतिच्याहि आज्ञेंत वागणें स्त्रियांस दुःसह होय, पण या करितां त्याचे आज्ञोल्लंघन करून उलट त्याच्यावर उठतां उपयोगी नाहीं. तसेंच त्याला सोडूनही उपयोग नाहीं. तर आपल्या बुद्धिकौशल्यानें आणि चातुर्यानें त्यास वाटेवर आणिलें पाहिजे. आतां याजपासून अशी एक शंका येण्या जोगी आहे, ती ही कीं, राजा जर जुलमी असेल तर प्रजेनें त्याचा त्रासच सोशीत राहावें कीं काय? ज्या अर्थी राजानें आपल्या प्रजेस त्रास देणें हें त्याचें कर्तव्य नाहीं. त्या अर्थी आपल्या कर्तव्या पासून भ्रष्ट झालेल्या राजाचा अधिकार, त्रास व जुलूम सोसणेंही न्याय ह्मणतां येणार नाहीं. तथापि राजानें आपलें कर्तव्य सोडलें ह्मणून प्रजेनेंही तो बंध एकदम तोडून टाकावा हें प्रशस्त नाहीं. कारण "**एकानें गाय मारली ह्मणून दुसऱ्यानें वासरूं मारूं नये.**" अशी आपल्यांत एक ह्मण आहे. तिचें स्मरण सर्वत्र ठिकाणीं ठेविलें पाहिजे.

आपणांस अपकार करणाऱ्यास शासन करण्याला कोणतीही हरकत नाहीं, हें जरी खरें आहे, तथापि ज्या पा-

सून अपकृति घडली त्याचा हेतु, ती वेळ, अपकार कर णाऱ्याच्या मनाची स्थिति, आणि त्याचा आपला संबंध, ह्या सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो. लहान मुलानें घेतलेला हट्ट त्याच्या आईनें न पुरविल्यामुळें, मुलास राग येऊन त्याणें आईस मारिलें या बद्दल उलट आईनें तसें केलें तर कांहीं उपयोग आहे काय? किंवा आईनें त्या मुलाला घरांतून घालवून दिलें, तर शोभेल काय? नाहीं. तर झालेल्या गोष्टी बद्दल त्याला नीट समजाऊन सांगून, व चार रागाचेही शब्द बोलून पुनः त्याचे हातून असे प्रसंग न येत अशी तजवीज केली पाहिजे. हीच गोष्ट **राजा** व **प्रजा** आणि **स्त्री** व **पति** यांजमध्येंही जाणावी. एखादे वेळीं **स्त्रीयेच्या** मनाविरुद्ध **पतीचें** वर्तन झालें, तथापि तेवढ्यावरून तिणेंही त्याच्या मर्जीची व आज्ञेची पर्वा करूं नये, असें ह्मणणें बरेंच साहस होय. या करितां **स्त्रियांनीं** आपलें कर्तव्य सोडून उपयोगी नाहीं.

आतां हें खरें आहे कीं, **स्त्री** व **पति** या उभयतांनींही परस्परांवर प्रीति करून परस्परांच्या आज्ञा मानल्या पाहिजेत. तथापि **स्त्रियांनींच** आपल्या या कर्तव्याबद्दल विशेष खबरदारी घेतली ह्मणजे बहुधा त्यांचे **पति** त्या पासून दूर राहणार नाहींत. अर्थातच ते आपलें कर्तव्य बजावितील. तशांतून पुरुष हे स्त्रियांच्या हातामध्यें सर्वस्वी आपलें जीवित व सुख सोंपवीत असल्यामुळें, त्याजबद्दल स्त्रियांनीं कृतज्ञता पूर्वक आपल्या पतीची आज्ञा शिरसामान्य करावी.



स्त्रियांची कळकळ बाळगणारे, व त्यांच्या सुख दुःखाची काळजी पाहणारे, कितीही सगेसोयरे असले, तथापि त्यांत **पतीची** सर कोणासही येणार नाहीं. फार तर काय, पण प्रत्यक्ष **आई** देखील **पति** सारखी तिची झीज सोशीत नाहीं.

आतां हें कांहीं मोठें आश्चर्य नव्हे. कारण आईनें आपल्या पोटचा गोळा वाढवून, व नीट नेटका, करून ज्याचे स्वाधीन केला, त्यानें त्याची जतन करणें व त्या करितां हरएक प्रकारें काळजी वाहणें हें त्याचें कर्तव्य होय परंतु यांत इतकेंच पहावयाचें कीं, केवळ **स्त्रीच्या** प्रीति करितां तिचा **पति** सर्वस्वी तिच्या सांगण्यांत राहतो.

**स्त्रियांना बाप, आई, भाऊ, बहिणी,** आणि इतर **आप्त सोयरे** यांणीं कितीही धन दौलत दिली तथापि **पतीच्या** देणगीची सर कोणांसही येणार नाहीं. तो तर तिला आपल्या सर्व धन दौलतीची मालकीण बनवून खेरीज स्वतःवरही तिचा तोच अधिकार कबूल करितो.

एका **स्त्री** करितां तो आपले **आप्त, सोयरे, भाऊबंद,** आणि **आई बाप** यांसही सोडून देतो. जगाच्या नियमा प्रमाणें हा मार्गही विहित आहे. **बायकांचे** नादीं लागून आप्त सोयऱ्यांस सोडणारे पुरुषास प्रस्तुत मूर्ख व स्त्रीजित समजात, याचें कारण निराळें आहे.

स्त्री जितपणानें पुरुषाची विटंबना होण्याचें कारण पाहूं लागलें असतां, स्त्रियांचें अज्ञान व त्या अज्ञानी स्त्रियांचें ना-

दीं लागणाऱ्या पुरुषांचा मूर्खपणा. बाकी पुरुषांनीं आपल्या स्त्रियांवर प्रीति करून त्यांच्याशीं ऐक्यतेनें व स्वतंत्रतेनें वागावें हें योग्य आहे. पण त्यामुळें त्यांना आपल्यास जन्म देणाऱ्या, व आपल्याला हरएक प्रसंगीं मदत करणाऱ्या **आईबापांस** आणि **आप्तसोयऱ्यांस** विसरणें, किंवा त्यांचा परामर्ष न घेणें हें अति **निंद्य** व **कृतघ्नतेचें** काम आहे, यांत संशय नाहीं.

जी **स्त्री पतीचें** हित इछित असेल व आपलें कर्तव्य जाणत असेल तिनें आपल्या **पतीस** वरील प्रकारची मसलत कधींही देऊं नये.

**सासुसासऱ्यास आईबापा** पेक्षांहि जास्त जपलें पाहिजे. तसेंच, पतीस तर प्राणापलीकडेहि तिनें जपलें पाहिजे. जेणेंकरून त्यास सुख होईल त्या रीतीनें वागून व पतीच्या आज्ञेंत राहून, उभयतांनींहि ऐहिक सुखें भोगावीं आणि सर्वत्रांशीं प्रीतीनें वागून आणि सर्वांवर यथाशक्ति उपकार करून कीर्ति जोडावी हेंच जन्माचें सार्थक होय.

**स्त्रियांच्या** या सर्व गोष्टी केवळ पतीचे योगानें सिद्धीस जावयाच्या असल्यामुळें त्यांनीं पति हेंच आपलें **आराध्यदैवत** असें जाणून, त्याच्याशीं सरळ व निष्कपटपणानें वागावें, आणि त्याची हरएक आज्ञा शिरसामान्य करावी हें त्यास भूषणास्पद आहे.

**भाग पहिला समाप्त.**



[stamp]

# सासुरवास चंद्रिका.

## भाग दुसरा.

## स्त्रियांचे अलंकार.

( पद ) राग-व्याहाग-ताल-दादरा.

" लग्नाला जातों मीं " या चालीवर.

**बायांनां आशा जी दागिन्यांचि ती ॥**
**आहे बहु जनरितीस निंद्य संप्रती ॥ धृ ॥**
**पतिठायीं प्रेम धरुनि ॥ क्षमा दया ह्यां सुगुणीं ॥**
**ये शोभा त्यां लागुनि ॥ अन्य न तें सांप्रत जनिं ॥**
**परि सुवर्ण भूषणांचि व्यर्थ त्यां रती ॥ १ ॥**

**स्त्रियांचे** अंगीं दिवसें दिवस अज्ञान जास्त वाढत चालल्यामुळें त्यांस आपलें कर्तव्यकाय, आपणांस भूषणास्पद अशा कोणत्या गोष्टी आहेत, व कशाचे योगानें आपला संसार सुखानें व आनंदानें चालून आपण कृतार्थ होऊं, या विषयीं त्यांचे भलभलते समज झाले आहेत, आणि त्या योगानें त्यांची आवड व **गृहस्थिति** फार विलक्षण होऊन गेली आहे. त्यांच्या अंगीं ज्या कित्येक नाशमूलक समजुती जडून गेल्या आहेत, व त्यांस कांहीं चमत्कारिक हौशी व डौल मिरविण्याच्या संवई पडल्या आहेत, त्यां पैकींच अलंकारांची ह्मणजे दागिन्यांची हौस हा एक मुख्य प्रकार ह्मटला असतां चालेल.

**स्त्रियांचें** वास्तविक **भूषण** ह्मटलें तर **पातिव्रत्य** ह्मणजे **पतिप्रेम** आणि त्यांचे खरे **अलंकार** ह्मटले ह्मणजे **सुनीति, सद्धर्म, दया, क्षमा, शांति, शुचिर्भूतता** व **नम्रता** हे होत. जगामध्यें मनुष्याच्या निर्वाहास अत्यावश्यक असे पदार्थ ह्मटले ह्मणजे **अन्न** आणि **वस्त्र**. त्या व्यतिरिक्त सर्व पदार्थ **चैनीचे** व **ऐषआरामीचे** होत. यांचा ह्मणजे मनुष्यांनीं संग्रह करूं नये असा अर्थ नाहीं, परंतु देश, काल व हल्लींचें वर्तन यांचे अनुरोधानें त्यांचा संग्रह किंवा त्याग करावा लागतो. सोन्यारुप्याचे दागिने हे लांकडाचे बाहूलीस, किंवा त्याच्या इतका ज्याला जगांत मान मिळतो अशा मूर्ख मनुष्यास नटविण्याकरितां आहेत.

सद्गुणी मनुष्यावर त्यांचें तेज पडत नसून त्या मनुष्याच्या सद्गुणानेंच उलटी त्या अलंकारांस जास्त शोभा येते.

अंगावर खंडीभर दागिने घातल्यानें मनुष्यास मोठेपणा येत नाहीं. परंतु आमच्या देशांतील **स्त्रियांस** हें कांहींच समजत नाहीं; त्यांना सगळा हव्यास कायतो दागिन्यांचा. त्या आपली सर्व प्रतिष्ठा दागिन्यांवर मिरवितात, गळ्यांत अडकविलेल्या ओझ्यावरी डागिन्यांनीं कंबर वांकून गेली तरी त्यांस त्यांचा कंटाळा येत नाहीं. मोठे वजनदार **काप** घालून **कानास** थोरलीं भोकें पडणें हें श्रींमतीचें लक्षण व प्रतिष्ठेची खूण आहे असें मानितात. **नाकांतल्या नथीची** तर इतकी सीमा वाढली आहे कीं, सर्व दिवस भर न-



कटें राहून एक तासभर ती नाकांत अडकविली तरी देखील वर्ष दोन वर्षांनीं नाकाचें एक भोंक तुटावयास झाल्यामुळें दुसरें टोंचण्याचा प्रसंग येतो. **पायांतले पैंजण,** व **तोडे** यांची मर्यादा इतकी वाढली आहे कीं, शिक्षा झालेल्या कैद्याचे पायांत तितक्या वजनाच्या बिड्या देखील नसतील. या तोड्यांचे योगानें पायांस खटें पडून चालण्याची देखील पंचाईत पडते. तरी त्या तशी तिडीक सोसून लंगडत चालतात. पण त्यांची हौस सुटत नाहीं.

कांहीं अलंकारां विषयीं आमची कित्येक पुरुष मंडळी देखील स्त्रियां प्रमाणेंच वेडगळ हौसे मध्यें गुंग असते. याचें उदाहरण पाहवयाचें असल्यास त्यांचे "**भीकबाळीचा**" थोडा विचार करूं. **भीकबाळी** हा शब्द **भीक** व **बाळी** या शब्दांपासून झाला आहे. **भीकबाळी** ह्मणजे **भिकेची** किंवा **भीक मागून** केलेली बाळी. पूर्वीं मूलें वांचत नसलीं ह्मणजे कोणी कसाही श्रीमंत असला तथापि भीक मागून एक सोन्याची बाळी करून मुलाचे कानांत घालीत असत व असें केलें ह्मणजे चार चौघांचे पुण्याईनें तरी हें मूल वांचेल अशी लोकांची समजूत असे, व अद्यापही कोठें कोठें आहे. पुढें या बाळीची चाल पडून लोक तिचा साधारण उपयोग करूं लागले आहेत. पुढें त्यांत मोत्यें वगैरे घातलीं असतां कानाला शोभा येईल असें समजून त्यांत मोत्यें गुंफूं लागले व होतां होतां ती **भीकबाळी** अलंकारांमध्यें मोडून

दीड दमडीची बाळी मोठ्या दागिन्यांत गणली गेली. हल्लीं श्रीमंतांचे कानांत करवंदा सारख्या हजारों रूपयांच्या पाणीदार मोत्यांच्या **भिकबाळ्या** लटकलेल्या आपण पाहतों. अशा या टोलेजंग **भिकबाळींनें** कान दुखूं लागून सुजतो व केव्हां केव्हां त्यास सहन न होण्याजोगी तिडीक लागते. तथापि ही वेडगळ हौस सुटत नाहीं!

ज्या प्रमाणें पुरुषांची **भिकबाळी** त्याच प्रमाणें **स्त्रियांची नथ**. आतां **स्त्रियांस** दागिन्यांचा अतिशय सोस असून प्रत्यक्ष **राजाचे राणीला** देखील ते कधीं पुरेसे होत नाहींत. **स्त्रियांच्या** या वेडगळ हौशी मुळेंच लग्नामध्येंही मुलीस प्राधान्य सुखकारक जो **पति** त्याजकडे दुर्लक्ष होऊन मुलीस दागिन्यांनीं भरून काढली ह्मणजे तिची आई संतुष्ट होते. मग जांवईबुवा वेडगळ व शंख कां असेना? **स्त्रियांचे पातिव्रत्यासही** या योगानें धक्का बसतो. या दागिन्यांचीहौस जितकी गुजराथी **स्त्रियांत** आहे इतकी आमच्या मतें दुसऱ्या कोणत्याच जातींत नसेल. **गुजराथी बनीया** कितीही गरीब असला तथापि इतर जातींतील साधारण पैसेवाल्याशीं तरी तो बरोबरी करीलच करील. अशी त्यांची स्थिति असते ह्मणून कांहीं तरी बरें? नाहीं पेक्षां त्यांच्यांतील **स्त्रिया** दागिन्यांकरितां काय करत्या नकळे. ही व्यर्थ हौस **स्त्रियांच्या** अज्ञान पणामुळें जास्त फैलावली आहे.



दागिन्यांची चाल पूर्वापार असून ती ह्मणजे सर्वथैव त्याज्य आहे असें ह्मणतां येत नाहीं; व त्यापासून मनुष्यांस व विशेषतः **स्त्रियांस** भूषित होण्यास ते फार उपयोगी असून हे अंगावर धारण करण्या विषयीं **शुक्राचार्य** प्रभृति व्यवहारचतुर पुरुषांनींही आपले ग्रंथांतून याजबद्दल चांगलें वर्णन केलें आहे. तथापि नुसत्या त्या अलंकारांचे योगानें केवळ मनुष्याला बाह्य शोभा आली, तथापि त्या पासून खरें भूषण प्राप्त होत नाहीं. कारण तें तर मनुष्याच्या सद्गुणांवर अवलंबून आहे. अलंकार धारण करावयाचे ते देश, काल व वर्तन यांस अनुसरून करावे लागतात. आणि त्यांची समृद्धीही देशाच्या भरभराटींतच असते. व तसें होणेंही साहजीक आहे.कारण घरांतील किंवा कुटुंबांतील सर्व मनुष्यांस अन्न वस्त्रास व व्यापारधंद्यास पुरून उरे इतकी संपत्ति झाली ह्मणजे ती अशा कामास गुंतवून ठेवण्याचा सांप्रदाय असून अर्थशास्त्रवेत्ते पुरुषांचेंही मत असेंच आहे.

तेव्हां ज्या वेळीं लोकांचे घरांतून टोपल्यावरी दागिने होते त्यावेळीं देशामध्यें संपत्तीची इतकीसमृद्धि होती कीं दागिन्यांमध्यें घालण्याकरितां लोकांजवळ हमेषा पैका शिल्लक राहत असे. परंतु प्रस्तुत काळीं दागिन्यांचा तसा हव्यास बाळगणें व त्याप्रमाणें त्यांत हजारों रुपये गुंतविणें, हें इष्ट आहे कीं काय? ही गोष्ट विचार करण्या सारखी आहे.

आतां दागिन्यां विषयीं लोकांची इच्छा जरी पूर्वी प्रमाणेंच जागृत आहे तथापि ती सिद्वीस जाण्याची कितपत आशा आहे हें पाहिलें पाहिजे, कारण—एखादा श्रीमंत गृहस्थ आपल्या भरभराटीचे स्थितींत यथेच्छ मिष्टान्न भोजन व ऐषआराम करितो. व तशा तऱ्हेनें वागण्याची त्यास नेहमीं सवयही असते. परंतु तो श्रीमंत कालें करून व दुर्दैवानें विपत्तिस्थितींत आला असतांही त्यानें आपल्या योग्यतेकडे लक्ष्य न देतां त्यानें आपलें वर्तन वरील प्रकारचेंच ठेवलें तर त्याची काय स्थिति होईल व त्याचा असा वेडगळपणा किती दिवस चालेल याचें अनुमान होणें साहाजिक आहे.

**तुकारामबोवांनीं ह्मटल आहे" जैशी जैशी वेळ पडे, तैसें तैसें होणें घडे "** तेव्हां या धूर्त कवीच्या सर्वप्रसिद्ध वचना प्रमाणें सर्वांनीं वागणें अगदीं जरूर आहे

आपल्या देशाचे उन्नतीमध्यें अतीशय दागिने करण्याचीं, व त्यांत लाखों रुपये गुंतविण्याची, जी चाल पडली होती, त्यास त्या वेळचे स्थितीचे मानानें दोष देतां येत नाहीं, परंतु प्रस्तुतचे लोकस्थितीचे मानानें तसें करणें आपणास योग्य आहे किंवा नाहीं याचा विचार करूं.

आतां सर्व लोक असें कबूल करतील कीं, प्रस्तुतची आपली देशस्थिति फारच बाईट आहे. परदेशीय राज्याचे योगानें या देशांतील संपत्ति बाहेर जाऊन दिवसें दिवस



ती कमी होत चालली आहे. **राजे रजवाडे** वगैरे लोक एका मागून एक मोडकळीस येऊन दागदागिने, भांडीकुंडीं व घरेंदारें आणि अखेरीस इनाम वतनें देखील रसातळास घालवीत आहेत. यामुळें पूर्वी जे दागिने लोकांचे घरांत दृष्टीस पडत असत त्यांची हल्लीं नावें देखील नष्ट होत चाललीं आहेत; तथापि लोकांचा त्याजबद्दल हव्यास कमी झाला नाहीं. या हव्यासानें व्यापाराच्या कामीं पडणारा पैका दागिन्यांत गुंतून जात असल्यामुळें तितकी संपत्ति अनुत्पादक स्थितींत राहते, इतकेंच नाहीं तर ती नाशकारक स्थितींत जाऊन शेवटीं झिजतां झिजतां अगदीं लयास जाते. या दागिन्यांबद्दल लग्नकार्यामध्यें जी अट पडते व त्याचे योगानें मनुष्य जो अडचणींत पडतो तो प्रकार फार विलक्षण आहे.

लग्नकार्यामध्यें एकतर अतीशय खर्च करण्याची चाल आहे आणि खेरीज **व्याहीविहिणीचे** अटीकरितां दागिन्यांची कबुलायत करण्याचा प्रसंग आला ह्मणजे बिचारा कार्यकर्ता मनुष्य वेडावून जाऊन कसें तरी कर्जवाम करून कार्य पार पाडतो. परंतु याचे योगानें एकदां तो अशा ओढींत पडून जवळ असलेली व व्याजू वगैरे काढलेली संपत्ति अशा अनुत्पादक स्थितींत त्याणें टाकली, ह्मणजे मग त्यास ती ओढ पुरी करतां करतांच मारामार पडते. हल्लीं आपल्या देशांत एकंदर बावीस कोटी लोकवस्ती आ-

हे. तेंव्हां त्यांत जरी एक त्रितीयांश किंवा प्रकृत विषयाशीं ज्यांचा संबंध आहे, अशा एक चतुर्थांश स्त्रिया मानल्या तथापि पांच साडेपांच कोटी होतील. आतां या पैकीं प्रत्येक स्त्रियेच्या मागून दागिन्यांची झीजफूट वगैरे मिळून निदान दरसालांतून आठ आण्याचें नुकसान मानलें तथापि अडीच कोटीचा शुद्ध नाश झाला असें ह्मणावें लागतें. खेरीज लग्नकार्य वगैरे सर्व गोष्टी धरून प्रत्येक स्त्रीच्या प्रीत्यर्थ दागिन्यांकरितां सालिना जरी एक रु० खर्च लागेल असें मानलें तथापि आज केवढी रकम गुंतली जाणार आहे! आज इतकी रकम भांडवल करून जर एखादा कारखाना काढला तर त्या पासून किती लोक अन्नाला लागतील बरें? बरें इतकेंही होऊन पुनः संपत्ति कायमच्या कायम राहून खेरीज आणखी कांहीं तरी व्याज उत्पन्न होईल.

स्त्रियांच्या अलंकारांमध्यें सुवर्णादि मौल्यवान् व देशोन्नतीस साधनीभूत जो व्यापार त्यास आदिस्थान असा जो धातु तो दागिन्यांचे रुपानें गुंतून राहतो, त्यापासून जें देशाचे नुकसान होतें तें दाखविण्यास अर्थ शास्त्रानें प्रमाण घेणें अवश्य होय.

आतां दागिन्यांचे योगानें स्त्रिया भूषित होऊन दृष्टिरम्य झाल्याचे योगानें त्यांच्या पतीस त्या विशेष प्रिय होतात असें जरी कित्येक प्राचीन विद्वानांचेंही मत आहे, तथापि स्त्रियांना मुख्य भूषण ह्मटलें तर सद्गुण होय, असें



संपूर्णांचें एकमत आहे. यामुळें सर्व **स्त्रियांनीं** सद्गुण संपादनाविषयीं विशेष झटलें पाहिजे. नुसत्या **दागिन्यांनीं** प्रतिष्ठा व मान्यता मिळत नाहीं; तथापि दागिने ह्मणजे अलंकार, हे शरिरास शोभा देणारे असें पूर्वापार मत आहे असें दिसून येतें. मग त्यांस किंमत, वजन व आकार काल मानानें व लोक स्थितीचे योगानें कमी जास्त होऊन प्राचीन रीतीस व अर्वाचीन रीतीस जमीनअस्मानाचें अंतर पडलें असें दिसतें.

**पूर्वींचे दागिन्यांचें** वर्णन पाहिलें असतां फार चमत्कारिक वाटतें- **कृष्णाचींच बाळपणचीं भूषणें पहा, मयूरपुच्छांचा मुकुट, गुंजाहार** वगैरे भूषणें त्यास अत्यंत प्रिय होतीं. पुढें जशी जशी देशामध्यें संपत्तीची समृद्धी होत गेली तसतसे अति मौल्यवान अलंकार अंगावर धारण करण्याचा प्रघात पडला. याचें कारण तरी वास्तविक पाहूं लागलें असतां केवळ शोभे करितां असें ह्मणतां येत नाहीं. त्या अलंकारांमुळें लोकांनीं आपणास श्रीमंत ह्मणावें व श्रीमंतीचे योगानें लोकांत आपली मानप्रतिष्टा व्हावी असा हेतु उत्पन्न झाला असावा असें अनुमान करण्यास कांहीं एक हरकत नाहीं.

**नुसत्या** शोभे करितांच जर अलंकार धारण करावयाचे असें मानलें, तर खोटे दागिने कांहीं कमी शोभा देतात कीं काय? खरीं मोत्यें व खरें सोनें या पेक्षांही खोठ्याला

जास्त तेज दिसतें. आलीकडे जे '**चायनागोल्ड**' ह्मणजे ज्याला सोनपितळ ह्मणतात तें एक वजन खेरीज करून सोन्याशीं शोभेच्या वगैरे मानानें पूर्ण बरोबरी पावत असून किंमतीनें फारच कमी असतें. परंतु तसे अलंकार कोणीही धारण करीत नाहीं.

**जे अलंकार** धारण केल्यापासून लोक आपणास संपात्तिमान् समजतील; असे अलंकार धारण करण्याचा सांप्रदाय पडला आहे.

**देशाच्या** समृध्द दशेमध्यें लोकांनीं असें समजणें व त्या प्रमाणें करणें हें शोभेल, व अशा प्रकारच्या गोष्टी त्या वेळीं लोकांस सुचतातही. याचें उदाहरण पहावयाचें असल्यास '**युरोपियन**' लोकांचे प्रस्तुतचे स्थितीकडे थोडें लक्ष्य दिलें ह्मणजे आपणांस दिसून येईल कीं **इसापनितींतील "कोल्हा आणि द्राक्षें"** या गोष्टी प्रमाणें हिंदुंच्या अलंकारांचा तिरस्कार करणाऱ्या व ते धारण करणारांस हंसणाऱ्या **युरोपियन** लोकांस हिंदुस्थानचें राज्य प्राप्त झाल्या पासून त्यांच्यांतील **अलंकारांचा** प्रघात पूर्वीपेक्षां पुष्कळ पटीनें जास्त वाढला आहे, व आणखीं बरेच दिवस या देशाचें राज्य जर इंग्रजांचे हातांत राहील तर आह्मांस वाटतें कीं, आमच्या स्त्रियांच्या नथी विषयींही **युरोपियन मडमांस** आसक्ति उत्पन्न होईल यांत बिलकूल संशय नाहीं. स्त्रिया दागिन्यावर आपली मानप्रतिष्टा व मोठेपणा मानतात. अंगावर



चार दाग दागिने घालून चार बायकांत गेल्या ह्मणजे त्यांला मोठा मान मिळतो हेंही खरें आहे. याचें कारण स्त्रियांमध्यें अज्ञान जास्त वाढलें हें होय.

**आपण** असेंही पाहातों कीं, एखादी पोक्त व सुविचार संपन्न **स्त्री** अंगावर दागिने नसतांही **बायकांचे** मेळ्यांत गेली असतां दागिन्यांनीं भरलेल्या **स्त्रियाही** तिला मोठा मान देतात. हाच प्रकार **पुरुषांमध्येंही** आपल्या दृष्टीस पडतो. ऐपती प्रमाणें लत्ताकपडा व दागदागिना नसणेंही बरोबर नाहीं. सर्वांनीं व्यवहारामध्यें आपापल्या योग्यते प्रमाणें **अन्नवस्त्र** व ऐषआराम करावा हें उचित होय. ह्मणून ज्यांना अनुकूळ असेल त्यांनीं आपल्या **स्त्रिया** केवळ अलंकार विरहित ठेवणें अप्रशस्त होय. वास्तविक पाहिलें असतां अलंकारांमध्यें घालण्या जोगी संपत्तीची समृद्धी होणें हें देशोन्नतीचें ढळढळीत उदाहरण होय. पण हल्लींचे या देशाचे स्थितीचे मानानें पाहिलें असतां तशी वेळ फार दूर आहे, ह्मणून अशा अनुत्पादक कामांत पैसा न घालण्याचा जितका इलाज करावा तेवढा थोडाच आहे.

आतां या गोष्टी बद्दल विचार करणें तो **पुरुषां** पेक्षां **स्त्रियांनीं** जास्त केला पाहिजे.

**प्रपंचामध्यें पुरुषांपेक्षां स्त्रियांचें** माहात्म्य व प्राबल्य मोठें असतें हा सर्वांस अनुभव आहे. **पुरुष** हे आपणांस स्वतंत्र मानून **स्त्रिया** ह्या आपल्या ताबेदार व आपण सांगूं त्या-

प्रमाणें ऐकणाऱ्या अशा त्यांस मानतात व त्याप्रमाणें वागवितात हें जरी खरें आहे तथापि प्रपंचाचें सर्व गाडें लक्षांत आणलें तर विचाराअंतीं आपणांस कळून येईल कीं, आपलें हें ह्मणणें केवळ बाह्यात्कारी व कोत्या समजुतीचें होय. वस्तुतः त्यामध्यें कांहींच अनुभव नाहीं.

**प्रपंच्याचा** चाललेला व्यवहार लक्षांत आणला तर आपली खात्री होईल कीं स्त्रिया पुरुषांच्या आज्ञेंत राहणाऱ्या किंवा परतंत्र नसून त्यांचे ठिकाणीं मानलेले गुण पुरुषांसच लागू पडतात. ह्मणजे पुरुष बहुधा स्त्रियांचे आज्ञेंत राहणारे असे असतात.

आतां वास्तविक पाहिलें असतां हाप्रकार असाच असला पाहिजे असें सुज्ञ लोकांचें मत आहे. पण हल्लीं ज्या तत्वावर व समजुतीवर तो प्रकार चालला आहे तें तत्व किंवा ती समजूत चुकीची आहे यामुळें सर्वच घोंटाळा होतो. **"शेजारणीशीं पडेना आणि घडीभर चालेना"** अशी आपल्यांत एक ह्मण आहे. त्या ह्मणी सारखा प्रस्तुत बहुधा **स्त्रीपुरुषांचा** व्यवहार झाला आहे. ह्मणजे **स्त्रियांना** मूर्ख, अज्ञानी,परतंत्र व तुच्छ तर मानावयाच्या, आणि त्यांची संगती व परिचय केल्या वांचून तर गत्यंतर नाहीं.

आतां एवढेंच नव्हे तर त्यांस आज्ञाधारक व परतंत्र मानावयाच्या आणि स्वतः आपलें व देशाचें नुकसान किंवा अनहित न जुमानतां व लोकोपहासाची वगैरे पर्वा न करितां **स्त्रियांची** आज्ञा मानण्याविषयीं एका पायावर तयार असावयाचें. तेव्हां याला ह्मणावें काय? घरांतील नोकर चोर आहे असें आपण मानीत असून व चार चौघांजवळ तसें सांगत असूनही जर आपल्या खजिन्याच्या किल्या त्याच्या स्वाधीन केल्या, तर त्यानें त्याची वाताहत केळी ह्मणून तक्रार करण्यांत कांहीं अर्थ आहे काय? या पेक्षां त्याच्या वर्तणुकी बद्दल व अधिकारा बद्दल आपली पूर्ण खात्री करून घेऊन आणि त्याचे योग्यतेबद्दल व कर्तव्याबद्दल त्यास जागृत व ज्ञानी करून मग जर त्याजवर असे जबाबदारीचें काम सोपाविलें तर तें त्याजपासून बिघडण्याची धास्ती राहणार नाहीं.



**स्त्रियांचे** अंगीं जडलेल्या आज्ञानाचा जर त्यांच्या पोषकांनीं कांहीं विचार न करितां त्यांजवर मोठ्या जबाबदारीचें प्रापंचिक काम सोंपविलें तर अर्थातच हिताहिता कडे जावें तसें त्यांचें लक्ष्य जाणार नाहीं. याच योगानें निरुपयोगी व अहितकारक गोष्टींत **स्त्रियांचा** हेका असतो, आणि त्यांच्या वजनदारीनें पुरुषांस तो पुरवावा लागतो.

---

**[ भाग दुसरा समाप्त. ]**

# सासुरवास--चंद्रिका.

## भाग तिसरा.

## संसार व त्यांतील स्त्रीपुरुषांची वागणुक.

( अंजनी गीत ) राग-झींजोटी—ताल--धुमाळी.

" शुक चंचूंतुनी वृक्षाखालीं " या चालीवर.

**ह्या संसारीं आप्तवर्ग हे ॥ गौण पाक्षं बुधजन तो पाहे ॥ स्त्रीपुरुषावांचुनि तो नोहे ॥ शब्दहि या लोकीं ॥ १ ॥ सुत दुहिता त्यां पासुनि होती ॥ ह्मणुनी संसारी त्यां वदती ॥ आप्त बंधु वरि करितां प्रीती ॥ होते फोलाची ॥ २ ॥ संतति साठीं बुधजनही ते ॥ काननिं करिती घोर तपातें ॥ सुत दुहितेची प्राप्ती गमते ॥ सुखकर सकलांसी ॥ ३ ॥**

**संसार** ह्मणजे **स्त्रीपुरुषांच्या** आश्रमधर्मादि आचारापासून होणारें फल जें **पुत्ररत्न** किंवा **कन्यारत्न** तेंच. तेव्हां संसार शब्दामध्यें घरदार आप्तसोयरे, व इष्टमित्र इत्यादि जरी अनेक प्रकारचे संबंध असतात, तथापि खरोखर पाहिलें असतां **स्त्री, पति** आणि **पुत्र** किंवा **कन्या** यांसारखा दुसरा कोणताही अवश्य व दृढ संबंध नाहीं.

या व्यक्तित्रयांत जर एखादें व्यंग असेल तर इतर गोष्टी कितीही अनुकूल असल्या तथापि **संसार** शब्दाची खरी योग्यता येणार नाहीं.



आपल्या देशांतील सर्वमान्य ऋषींनीं **पुत्र** रत्नाचीच विशेष प्रशंसा केली असून **संसार** सुखाचें खरें तत्व व **वंशोद्धाराची** केवळ **नौका** ह्मटली ह्मणजे **पुत्र** होय, असें त्यांचें मत आहे, व **पुत्र** लाभा करितां सार्वभौम ऐश्वर्यासही तुच्छ मानून तपोवना मध्यें तपाचरण करणारे शेंकडों राजांचीं उदहारणें आपल्या ऐकण्यांत आहेत. प्रस्तुत लोकोपचारांतही पुत्ररत्न विशेष प्रशंसनीय व आनंददायक मानण्याचा आपणांस अनुभव आहे. तेव्हां अशा दुःसाध्य **' पुत्ररत्नाशीं ' 'कन्यारत्नाची'** साम्यता करणें मोठें साहस आहे असें आमच्या वाचकांस कदाचित् वाटेल. परंतु ही मोठी चूक आहे.

**कन्या** व **पुत्र** हीं एकच **आईबापा** पासून व एकच **सृष्टिक्रमानुरूप** निर्माण होणारीं असल्यामुळें व **सृष्ट्युत्पत्तीच्या** कामीं ईश्वर नियमानुसार उभयतांचाही सारखाच उपयोग असल्यामुळें परस्परांच्या सुखसमाधानाची सामग्री एकमेकांवर पूर्णपणें अवलंबून आहे.

अशी स्थिति असतां एका व्यक्तीचा उपयोग कमी व दुसरीचा जास्त मानणे हा केवळ वेडगळपणा होय, आणि हा प्रकार दिवसें दिवस जास्त वाढत असल्या मुळेंच **संसारसुखास** जास्त हरताळ लागत चालला आहे.

**संसारामध्यें स्त्रीपुरुष** हीं परस्परांस साह्य भूत व मित्रभावानें राहाणारीं असल्यामुळें एकमेकांमध्यें उच्च नीच-

पणा मानल्यास त्यापासून उभयतांसही मित्रसुखाचा अनुभव मिळणें अवघड होय. कारण "**समानशीले व्यसनेषु सख्यम्**" अशी आपणांत म्हण आहे. त्यांतून **स्त्रीपुरुषांची** मैत्री म्हटली म्हणजे आयुष्य मर्यादेपर्यंत असल्यामुळें त्या परस्परांत सख्य असलेंच पाहिजे.

आतां **पुत्र**प्राप्ती करितां अनेक राजांनीं अनेक सायास व तपश्चर्या केल्या हें खरें; परंतु कित्येक राजे लोकांनीं वरप्राप्तीचे प्रसंगीं **कन्यारत्नाचें** मागणें केल्याचें प्रसिद्ध असून, प्रसंग विशेषीं कित्येकांनीं आपल्या आवडत्या व सुजाण **कन्यकांचे** हिताकरितां पराक्रमी व **बलाढ्य पुत्राची** पर्वा न करितां **कन्येचे** मतास अनुसरल्याचेंही आपण ग्रंथांतरीं वाचतों. तेव्हा आपल्या पूर्वजांची **स्त्रियां** विषयीं अशी पूज्य बुद्धि असतां आपण केवळ अज्ञानानें त्यांस कमी किंवा नीच मानणें हें मोठें साहस होय.

आपल्या देशाच्या पूर्वापर रितीभाती वरून पाहतां स्त्रीपुरुषांमध्यें कमी जास्तपणा न मानतां उभयतांस सारखा मान व सारखी योग्यता दिल्याचें आढळतें. याचें ढळढळीत उदाहरण विवाह संबंध होय.

**विवाहसमयीं पतीनें पत्नीस** जीं अभय वचनें द्यावयाचीं व जें करार करावयाचे त्यांजवरून पाहातां उभयतांचेही हक्क सारखे असतात असें सिद्ध होतें. परंतु आपल्यामध्यें **स्त्रीपुरुषांचा** मैत्रीकर असा जो विवाह संबंध त्याची खरी



योग्यता व खरा उद्देश याचा लोप होऊन प्रस्तुत त्याचा जो प्रचार पडत चालला आहे त्यांत **नवरानवरींच्या** खऱ्या योग्यतेकडे, साम्यतेकडे, **रूपयौवनाकडे** व ऐश्वर्याकडे मुळींच लक्ष्य देत नसून, **व्याहीविहिणींच्या थाटमाटाकडे**, भिकार व निष्कारणीं डामडौलाकडे, आणि घरादाराकडे कायतें सर्व लक्ष्य असतें.

**नवरानवरी** हीं केवळ आपल्या हौशी करितां उभीं केलेलीं **भावलाभावलीं** असल्यामुळें त्या विपरीत विवाह विधि पासून **नवरानवरीस** सुख किंवा समाधान तें काय होणार?

**लग्नामध्यें मुलाचे आईचा** मोठा मान असून **मुलीचे आईचा** सर्वतोपरी तिची समजूत करतां करतां कमरेचा कांटा ढिला होतो.

**मुलगी** होणें हें एक मोठें पातक असून त्याच्या प्रायश्चिता करितां लग्नसमयीं **मुलीचे आईस** जसी काय कडक शिक्षाच होत आहे व त्या करतां आपला तिनें मान राखावा व आपली तब्यत संभाळावी हा आपण मुलाची आई असल्यामुळें आपला हक्कच आहे असें मुलाचे आईस वाटतें.

**लग्नाची** आवश्यकता **मुलाचे व मुलीचे** आईस एक सारखीच असून ती परस्परांचे सख्या वांचून व ऐक्यावांचून सिद्धीस जावयाची नाहीं.

लहाणपणीं लग्नें केल्यामुळें त्यांस विवाहाची योग्यता, त्यापासून जडणारा परस्परांचा संबंध आणि विवाहप्रसंगीं घडणारीं कार्ये, यांची त्यांस मुळींच माहिती नसल्यामुळें विवाहांतील सर्व अटी व तंटे बखेडे आणि थाटमाट कायते व्याहीविहिणीचेच असावयाचे.

**विवाह** करावयाचा ह्मणजे मुलीपुढें एक मुलगा उभा करून **‘ हा तुझा नवरा ’** व त्या मुलास **‘ ही तुझी बायको ’** इतकें कायतें शब्दज्ञान करून द्यावयाचें. आणि या जगांतील अतिशय महत्वाचा व जन्मांतील सार्थकतेचा जो हा विधि त्याचा **नवरानवरीचे** मनावर ठसा, ह्मणजे परस्परांनीं एकमेकांस लाजावें व एकमेकांकडे पाहूंही नये हा होय. जो संबंध परस्परांमध्यें प्रिति, स्नेह व धैर्य उत्पन्न करावयाचा त्या पासून भीति लज्जा व परकीपणा उत्पन्न होणें हें त्या संबंधाविषयींचें पूर्ण अज्ञान ह्मणजे बालविवहा होय आणि यामुळेंच जसें एखादा मूर्ख, जुलमी, अविचारी किंवा अज्ञानी राजा असला ह्मणजे प्रधानादि मंडळीचें पूर्ण वर्चस्व असून त्यांच्या इच्छा व त्यांचें वैभव प्रबल असतें, त्याच प्रमाणें या विवाह विधींत **नवरानवरीच्या** अज्ञानग्रस्त पणामुळें व्याही विहिणीचें मोठें प्राबल्य असतें.

**नवरी**कडील पक्षाचा कमीपणा मानण्याचें कारण पाहूं लागलें असतां प्रपंचामध्यें **स्त्रीपुरुषांचे** संबंधांत जो कमीज्यास्तपणाचा प्रकार वाढत चालला आहे तो होय. तेव्हां



**संसाराचे** घटनेंत किंवा समजुतींतच जर चूक असली तर त्या पासून हित किंवा सुख तें काय होणार? **संसारामध्यें स्त्रीपुरुष** आणि **पुत्र** किंवा **कन्या** यांचा दृढ संबंध असून इतर नातीं किंवा संबंध त्यांच्याच परंपरया स्थितीनें व अनुसंगानें होणारे आहेत.

**स्त्रियांची** जात फार कोमल व सुखदात्री आहे. थकून गेलेल्या पतीचा थकवा उतरणारी, **दुःखित पतीचें** दुःख निवारण करणारी व दरिद्री पतीचें दारिद्र्य हरण करणारी अशी आहे. तिच्याशिवाय या कामीं इतर क्वचित् उपयोगीं पडतील. परंतु जी **स्त्री** तंटे करणारी, **कपटी, कर्कशा, अधिरी** ( उतावीळ ) **मत्सरी, चाहाडखोर** व **नखरेबाज** ती कदापि आपल्या पतीस सुखदायक होणारी नव्हे; परंतु उलटी दुःखदायक मात्र होते, आणि त्या योगेंच घरांतील लक्ष्मी जाऊन दरिद्र वृद्धिंगत होत जातें.

**स्त्री** या शब्दास योग्य अशा सांप्रत संसारांत भूषणदायक **स्त्रिया** थोड्याच आढळतील. **स्त्री** व **पति** हीं दोन नांवें इतकीं पवित्र आहेत कीं, त्यांविषयीं आमच्यानें बरोबर वर्णन सुद्धां करवणार नाहीं. **स्त्री** जरी **तरुण, रूपवती** व **हास्यवदनी** असली, तरी ती **स्त्रीच्या** नांवास योग्य ठरत नाहीं. **स्त्री** बेताबातानें घर संसार चालविणारी, पाकविद्या जाणणारी, व **शिल्पकलेंत** निपुण अशी असली पाहिजे. **स्त्रियांच्या** अंगीं **सौजन्यता, समयसूच**-

कता, नम्रता, शांति, निष्कापट्य, चातुर्य, मिताहारीपणा, समानवृत्ति, धैर्यता, सुबुद्धि, स्थिरता, हिंमत, सदाचरण, हे सर्व सद्गुण अवश्य असलेच पाहिजेत.

पतीस प्राणाहूनही जास्त समजून त्याची खऱ्या अंतःकरणानें सेवा करून, त्याचे प्रसन्नतेवरच आपली प्रसन्नता जाणणें, त्यानें तिचा तिरस्कारही केला तरी तिनें त्याविषयीं मनांत वैरभाव न आणणें, तो जी आज्ञा करील ती करण्यास सिद्ध होणें, पतीच्या नंतर निजणें व प्रथम उठणें आणि आपले मनोभाव शुद्ध अंतःकरणानें त्याजवळ प्रगट करणें, पतीशिवाय अन्य पुरुष भावा बापा प्रमाणें समजणें. पतीस भोक्ता व आपल्या आत्म्यास योग्य असें मानणें, पतीस पुष्कळ अंशानें स्वतंत्र व आपण त्याहून कांहीं अंशानें परतंत्र असें मनांत आणणें, वडील जनांची सदा सुश्रुषा करणें, अशा गुणांनीं जी युक्त असेल तीसच स्त्री किंवा पत्नि असें नांव शोभतें.

सुशील स्त्रियांसाठीं पति मगरूर, कठोर, निर्दय, मूर्ख, आळशी, अविचारी, क्षणिकबुद्ध आणि अधर्मी, असा केवळ अयोग्यच होय!!

अशा स्त्रीचा भ्रतार होणें तर प्रथम त्या पुरुषास लज्जा, क्षमा, सुशीलत्व, धैर्य, गांभिर्य, चातुर्य, औदार्य, शूरत्व, दृढनिश्चयीपणा, विलास, विद्या, सुमा



गोंपजीविक, परिणामदृष्टी, बुद्धिवान् आणि उद्योगी वगैरे सद्गृहस्थांचीं सर्व लक्षणें असलींच पाहिजेत.

आणखी तो मित्रांत सुखरूप, शत्रूंत सिंहरूप, वडीलमाणसांचा आज्ञाधारक, लहानांचा साह्यकारी, दुःखितांचा साथी, आणि सर्वांस प्रिय असा असावा, जी आपली स्त्री (अर्धांगना) तिची वाजवी इच्छा पुरुष जर अपूर्ण न ठेवील तर आपल्या कुटुंबाला सुखदाता होईल, खोट्या चहाडीवर ध्यान न ठेवील, आपली योग्यता कधीं न सोडील, निंद्य वचन मुखांतून कधीं न काढील, अत्यंत दुःख पडलें तरी नीति न सोडील, व शरणागताचें रक्षण करण्यास मागेंपुढें न होईल असाच पति पाहिजे; आणि जो आपल्या स्त्रीच्या सुखदुःखास सामील राहील, तिला वारंवार नीतीचा उपदेश करण्यास विसरणार नाहीं, ज्या प्रमाणें कितीही कठीण प्रसंग गुदरला तरी सिंह आणि हंस कदापि अन्नसेवन करीत नाहींत, त्याप्रमाणेंच तो जीं जीं चांगलीं कामें करावयास हात घालील, त्यांत मन दृढ ठेवील, व आपली स्त्री अनीतीस प्रवृत्त झाली तर जसें आपणास वाईट वाटतें तसें तिलाहि आपल्या पतीच्या वाईट कृत्यामुळें वाटेल असें सर्वदा जो ध्यानीं मनीं वागवील तोच पति त्या स्त्रीस योग्य जाणावा.

अशा पवित्र जोड्यास शोभविणारा एक पुत्रच होय. सुपुत्र हें नांव ऐकूनच आपणांस आल्हाद होत नाहीं, नेत्र आनंदाश्रूनें भरून जात नाहींत, मनांत आनं-

दाच्या लहरी उठत नाहींत, कदाचित् आपण तारुणावस्थेंत असल्यानें आतां या गोष्टीची बूज होणार नाहीं, परंतु हें पक्कें समजावें कीं, " **जसा जगत् प्रकाशित सूर्य; तसा घर प्रकाशित करणारा पुत्र होय.** " जसें **सुर्योदया** नंतर **कमल विकासित** होतें तसें **पुत्र** जन्मानें **कुटुंबांतील** मनुष्यांची मुखें हर्षीत होतात आणि **स्त्रीपुरूषांची** प्रीति वृद्धिंगत होण्यास मुख्य कारणभूत एक **पुत्रच** उत्तम उपाय होय.

**पुत्र** असा नसावा कीं, जो रात्रंदिवस **मातापितरांस** दुःख देईल, त्यांच्या आज्ञा न पाळील, त्यांची सेवा-सत्कार न करील, विद्याभ्यास सोडून कुव्यसनीं पडेल, दुसऱ्याचा माल फुकट असें समजून लुटील, लोकाचार व कुळाचार न जाणील, आपण समर्थ असतांही **आईबापांच्या** भरंवशावर अनुद्यमी राहील, आणि वृथाभिमान करून; सर्व **संसारास** तृणवत् समजून; कोणा बराबरही मिळून राहाणार नाहीं. अशा **पुत्राच्या** योगानें कुल भूषित न होतां दूषित मात्र होतें. **महाजनांचें** असें ह्मणणें आहे कीं ज्याचें नांव नामांकित पुरुषांत **गणलें** जात नाहीं, त्याच्या **मातेनें संसारांत** केवळ **प्रसव** काळाची पिडा मात्र सोसली, परंतु **पुत्रजन्माचें** सुख कसें तें तिनें पाहिलें नाहीं.

**पुत्र** असा असावा कीं, ज्यानें जन्मापासून कुटुंबाची मर्यादा ठेविली, **मातापितरांस** सुख दिलें, कुटुंबाच्या



लोकांस संतुष्ट ठेविलें, जनांनीं भलें ह्मटलें, **पंडित** आणि प्रतिष्ठित लोकांच्या सभेंत सत्कार मिळविला, आणि ज्याचें आचरण पाहून लोक धर्माच्या मार्गी लागले.

**कन्या—पुत्ररत्नानें** जशीं **मातापितरें** भूषित व धन्य होतात त्याच प्रमाणें सुलक्षणी **कन्या** रत्नाचे योगानेंही **मातापितरांस** आति आल्हाद होतो. पण ती **कन्या** अशी नसावी कीं जी **करूप, मूर्ख, सुशिक्षे** विषयीं **आळशी, खादाड, अल्लड,** उपवर झाली असतांही जिला कोणी वरण्यास कबूल नल्यामुळें **मातापितरांचें** अंतःकरण जाळणारी, विवाहा नंतर आपल्या आडदांड स्वभावानें व हेवा आणि मत्सर यांचे योगानें **सासु सासऱ्यास, पतीस** व **आईबापास** दुःख देणारी, दुराचरणानें व मूर्खपणानें आपल्या **आईबापाच्या** व **सासु सासऱ्याच्या** नांवा लौकिकाकडे आणि कुलशीलाकडे न पाहतां सर्व संसाराची धुळधाण करणारी; अशी नसणें हेंच बरें.

**पुत्राचे** योगानें एका कुलास कालिमा लागतो. परंतु अशा प्रकारचे कन्येपासून उभय कुलें दूषित होतात. तेव्हां तीच **कन्या** खरी कीं; जी **सुलक्षणी, मर्यादशील, मातापित्यांस** आनंद देणारी, **चतुर, निष्कपटी, ममताळू, सुशिक्षित, उद्योगी, मधुर** भाषण करणारी अशी असून जिला अवलोकन करतांच **वडील** माणसांनीं आपणास **सून** असावी, **तरुण, सुंदर** व **चतुर** पुरुषांस ही आपणास **पत्नी** असावी, व लहान

**मुलाला ही** आपणास **मायबहीण** असावी असें वाटावें जिच्या कल्याणाबद्दल व सदाचरणाबद्दल **आईबापास** यत्किंचितही काळजी करावी लागूं नये; व तिणें दिवसानुदिवस आपल्या **आईच्या** सद्गुणांचा कित्ता वळवून प्रिय पतीस संतोषित करावें; व सृष्टीक्रमास अनुसरून **संसारवृक्षाचा** विस्तार **सद्गुणी संततीचे** योगानें वृद्धिंगत करावा.

आतां अशा सर्वगुणसंपन्न **कन्यारत्नापेक्षां पुत्ररत्नाची** प्रशंसा जास्त करणारा पक्षपाती कोण मिळेल बरें? **कन्यारत्नाचें** जें वर्णन केलें तें यथार्थ आहे, पण अशा **सद्गुणीकन्या** किंवा **स्त्रिया** जगांत आहेत कुठें? जिकडे तिकडे **दुराचारणी, मत्सरी, साहसी, कुरूप,** आणि **कर्कशा** अशा **स्त्रियांचाच** भरणा फार; **सद्गुणी स्त्रिया** क्वचितच दृष्टीस पडतात. ही गोष्ट पुष्कळ अंशी खरीही आहे. पण ज्या प्रमाणें **कन्यां** विषयीं किंवा **स्त्रियां**विषयीं हा अपवाद निघतो त्याचप्रमाणें **पुत्रां**विषयीं किंवा **पुरुषां** विषयीं निघत नाहीं काय? **सज्जन, सदाचारी, सद्गुणी** व **उद्योगी** अशा **पुरुषांची** संख्या जगांत किती बरें निघेल? अशीं रत्नें दुर्मीळच होत. जिकडेतिकडे **आळशी, दुराचारी, दुर्गुणी, मूर्ख** व तंटेखोर **लोकांचा** भरणा फार. तेव्हां तात्पर्य काय कीं ज्या प्रमाणें **सद्गुण** आणि **दुर्गुण** यांचें **स्त्रियांत** वास्तव्य असून त्यांत **सद्गुणी स्त्रियांची** संख्या फार थोडी असते त्याच प्रमाणें हा प्रकार **पुरुषां**विषयींही जाणावा. मग असें



असतां एकापक्षास चांगलें व दुसऱ्यास वाईट ह्मणणें हा पक्षपात नव्हे काय? तशांतून संसारामध्यें **स्त्री** व **पुरुष** यांचा इतका निकट संबंध आहे कीं, त्या उभयतांचे ऐक्यावांचून संसार शब्दाचा अनुभवच घडत नाहीं. या करितां संसारांत **स्त्री** व **पति** हीं मुख्य द्रव्यें असून **पुत्र** आणि **कन्या** हीं संसाररूपीं कारणाचीं खरीं कार्यें होत. ह्मणजे संसाररूप कल्पवृक्षाचीं **पुत्र** आणि **कन्या** हीं दोन्हींही सारखींच **सुंदर** आणि **मधुर** फळें होत. आणि सर्वांचें एकमत असणें हाच संसार होय.

**भाग तिसरा समाप्त.**

# सासुरवास--चंद्रिका.

भाग चवथा.

## स्त्रियांची सुधारणा.

( पद ) राग--झिंजोटी--ताल--दादरा.

"नाहीं झाले षण्मास मला" ह्या चालीवर.

**नाम इतरांसी गृहिणी हें काय देउनी ॥ प्रीति गुण नच ज्यांतेंविन ज्या धर्मचारिणी ॥ नाम ॥ धृ ॥ मान्य दमयंती जानकी तशी अरुंधती ॥ कांत सुदयेनें अन्य विषय वाद निवडिती ॥ त्या न फुंकाया चूल योग्य कथिति सन्मती ॥ समज थोर मन्मनीं ॥ १ ॥ नाम**

**"ग्रह स्थितीकडे दृष्टि दिली असतां आपलें कुटुंब ह्मणजे आपली स्त्री गृह संबंधी गोष्टींत पुरुषांची अर्धी विभागिनी आहे."**

"प्राचीन काळापासून सर्व लोकांत व सर्व देशांत **स्त्रियांस** फार उत्तम रीतीनें वागविण्याची रीत पडून गेली आहे, आपल्या देशांत त्याच प्रमाणें **स्त्रियांस** मोठा मान मिळत असे, असें पुरातन **ग्रंथां**वरून दिसून येतें."

आपल्या परमपूज्यपूर्वजांचे या संबंधानें विचार कसे होते व ते आपल्या स्त्रियांस कसे वागवीत असत, याचें स्पष्टीकरण फार चांगल्या रितीनें होतें. **सीता, द्रौपदी, दमयंती** वगैरे स्त्रियांची केवढी योग्यता होती? तसेंच



**अदिती, अरुंधती** वगैरे ऋषिपत्न्या न्यायानें व मानानें ऋषीं प्रमाणेंच श्रेष्ठ होत्या. त्या वेदादिक पढलेल्या असून **ऋषीं**बरोबर अनेक गहन **विषयांवर** वादविवाद करीत असत. ही स्थिति अगदीं प्राचीनकाळची झाली; परंतु अगदीं आलीकडे ह्मणजे **मुसलमान** लोक आमचे देशांत येण्याचे पूर्वी थोडे दिवस तशीच चाल चालत आलेली दृष्टीस पडते.

**"हें सुवर्णयुग लौकरच गेलें."** **मुसलमान** लोक या आपल्या देशावर स्वाऱ्या करूं लागले; लोकांस बाटविण्याचा व कत्तल उडविण्याचा सपाटा सुरू झाला. तेव्हां पहिली **स्थिति** अगदीं पालटली. लोकांस आपलें व आपल्या **मालमत्तेचें** व "**बायकापोरांचें**" संरक्षण करण्याचेंही **क-ठीण** पडूं लागलें. व प्रत्यक्ष **पुरुषांसही विद्यादिकांत** मन घालण्याची सोय नाहींशी झाली. तेव्हां जिचें कोणत्याही गोष्टींत **पुरुषावांचून** चालावयाचें नाही, त्या '**स्त्री**' जातीची काय स्थिति व्हावी? अर्थातच "**बायका**" ह्मणजे इतर वस्तू प्रमाणेंच जिवापलिकडे संभाळकरण्याची एक वस्तु, असें होऊन गेलें व त्यामुळेंच पडदपोषीची चाल पडून गेली.

कित्येक वेळां अशा गोष्टींही घडून आलेल्या त्यावेळच्या इतिहासांत आढळतात कीं, अपजया खेरीज दुसरी कांहीं आशा नाहींशी झाली. ह्मणजे इतर चीजवस्तूप्रमाणें "**बा-यकापोरांचीं**" होळी करून शत्रूंच्या अंगावर तुटून धा-

रातीर्थी देहविसर्जन करावा! तेव्हां अशी भयंकर स्थिति प्राप्त झाल्यामुळें इतरगोष्टींप्रमाणेंच **स्त्रियांची** स्थिति ही सांप्रतच्या मजलेस येऊन पोंचली. यांत नवल कशाचें? तेव्हां अशा गोष्टींचा परिणाम काय झाला कीं, **'बायका'** ह्मणजे दुसऱ्या कित्येक **संसार** संबंधाच्या वस्तु आहेत, तद्वत् होत.

**विद्याशिकून** काय करावयाचें आहे? त्यांनीं नेहमीं चुली जवळ असावें. इत्यादिकमतें आपल्या लोकांत दृढ होऊन बसलीं आहेत. परंतु आंग्लभौमसत्ता आपल्याकडे सुरू झाल्यापासून व त्या लोकांतील **स्त्रियांची** स्थिति दृष्टीस पडूं लागल्यापासून आपण ज्या रीतीनें **स्त्रियांस** वागावितों ती रीति यथायोग्य आहे कीं काय, याचा लोक विचार करूं लागले.

**पुष्कळ लोकांनीं** इंग्लिश रितीभाती लागल्याच खिकारून **"स्त्रिया"** ज्या अगदीं खालच्या पायरीवर होत्या, त्यांस तेथून अचानक नेऊन वरल्या पायरीवर चढाविलें. **"युरोपियन पोषाख, युरोपियनरेहेराव, युरोपियन काजळकुंकू."** इत्यादिक प्रत्येक गोष्टी आमच्या **"विद्वान लोकांनीं"** खिकारून आपल्या **'बायकांस'** साहेब बाहदुरांच्या **लेडींच्या** तुलनेस नेऊन पोंचविलें. परंतु या सर्व गोष्टींचा परिणाम चांगला न होतां फारच वाईट झालेला दृष्टीस पडतो.

याचीं उदाहरणें आपलेकडे पुष्कळ ठिकाणीं घडून आलेलीं दृष्टीस पडतात. असें होण्याचें कारण पाहूं गेलें



असतां आपल्या लोकांचा अधिरेपणा हें होय. कोणतीही गोष्ट पायरीपायरीनें केली पाहिजे. ती एकदम करून-टाकूं ह्मटलें तर मोठें कठीण आहे. मनुष्याचें मन हें **"घड्याळयांत जशी स्प्रिंग असते"** त्याप्रमाणें आहे. ती **"स्प्रिंग"** दाबांत असते तों पर्यंत पाहिजे तो उपयोग तिच्यापासून करून घेतां येतो. परंतु तिच्यावरचा दाब निसरतांच ती कोणीकडे जाऊन पडेल याचा नेम नसतो ह्मणून **स्त्रियांची** सुधारणा करणे ती फार बेतानें करावी.

आमच्या **"स्त्रियांनीं"** घेण्यासारखे गुण त्यांच्या **'स्त्रियांचे'** अंगीं असतील यांत संशय नाहीं. परंतु कोणत्याही कामांत देश काल वर्तमान पाहिले पाहिजे. त्यांची स्थिति कशी आहे व आपली स्थिति कशी आहे, याचा विचार केला पाहिजे. जे इंग्लिश लोक इकडे येतात,त्यांच्या व आपल्या स्थितीमध्यें जमीन अस्मानाचा फरक आहे.

**आमच्या** लोकांप्रमाणें त्या लोकांत एकाच **मनुष्या**वर कुटुंबांतील इतर सर्व मनुष्यांनीं उपजीवनाकरितां अवलंबून राहण्याची चाल नाहीं, यामुळें प्रत्येक जण स्वतंत्र असतो. आमच्या पायांत **"स्त्री" रूपी बिडी** बहुधा अज्ञानपणींच असते. त्यांच्यांत लग्न करणें प्रत्येकाच्या खुषीवर असतें. यामुळें आमच्या पेक्षां त्या लोकांत **'स्त्रियांस,'** साहजिक मोठी योग्यता व मान मिळतो. या शिवाय आमच्या लोकांत विशेषतः गरीब लोकांचा भरणा

फार, या मुळें **धनी, धनीन, चाकर**माणसें वगैरे सर्व अधिकार स्त्रीपुरुषांत परस्परांतच वांटून घेतलेले असतात. त्या लोकांची स्थिति पाहिली तर इकडे येणाऱ्या सर्व **गोर्‌-**लोकांस चांगला पगार मिळत असतो. **"साब, साब!"** करण्यास चाकरमाणसें सभोंवतीं उभीं असतात. **'मडम'** साहेबांस **'सासूची,** व 'चुलत **सासवेची'** भेट झाली, असा **कपिलाषष्ठीचा** योग कधींच येत नाहीं. तेव्हां इतकी भिन्नता त्यांच्यांत व आमच्यांत प्रत्यक्ष असतां आपल्या **'स्त्रियांची'** स्थिति सुधारण्यास **मडम**लोकांचा कित्ता घेऊन कधींही चालणार नाहीं.

प्रथम आमचे लोकांत **"स्त्रियांस"** विद्या शिकविण्याचा प्रघात पडणें अगदीं इष्ट आहे. **पुरुषां** प्रमाणें **'स्त्रियांचा'**-ही ज्ञान संपादण्याचा क्रम आपणां मध्येंपूर्वी पासून सुरू आहे. तेव्हां ही गोष्ट आज कांहीं नवीन सुरू कारावयाची आहे, असें नाहीं.

**लिहिणें, वाचणें,** थोडेंसें **गणित** करणें व **आपल्या भाषेंतील गद्यपद्यात्मक ग्रंथ** समजून वाचणें आणि जगांत काय चाललें आहे हें समजणें. इत्यादि गोष्टी फार अवश्य आहेत. ह्या इतक्या गोष्टी पासून हल्लीं प्रमाणें त्यांचा वेळ **'गप्पाष्टकांत** व्यर्थ न जातां, त्याची कांहीं तरी चीज होईल. हल्लीं आमच्यांतील **चारबायका** एके ठिकाणीं मिळाल्या कीं त्यांच्या गोष्टी **'दागदागिनें, 'लग्नकार्यें'**



**'मुलें, 'सासुसुनेचें भांडण'** याच्या बाहेर कधींही जात नाहीं. आपल्यांत तंटा भांडणें व वितुष्टें वाढण्यांत पुष्कळ वेळां या **स्त्रियाच** कारणभूत होतात. त्या जर विद्याविभूषित होतील तर त्यांचे विचार पोक्त होऊन त्या क्षुल्लक **गोष्टींत मन** घालणार नाहींत. तसेंच आपणांस ज्यांची जन्मभर संगत असणार त्या **स्त्रिया सुशिक्षित** असल्या ह्मणजे त्यां पासून आपणांस फारच फायदा होणार आहे!

**स्त्रिया सुशिक्षित** झाल्याह्मणजे त्या आपलीं मुलें स्वतः आपल्या पायीं शाळेंत जाण्यास योग्य होई पर्यंत त्यांस जुलुमानें शाळेंत न पाठवितां आपणच घरीं शिकवितील.

**लहानपणीं मुलें शाळेंत** जातांना हट्ट करितात, हें सर्वांस टाऊकच आहे. पुष्कळ वेळ असें होतें कीं शाळेंतील वाईट मुलांच्या संगतीनें **कोंवळ्या** मनावर वाईट संस्कार होण्याचा फार संभव असतो, या करितां त्यांस अगदीं लहानपणीं शाळेंत न पाठवितां थोडेंसें लिहिणें, वाचणें वगैरे होई पर्यंत घरींच शिकवावें हें फार चांगलें. **पुरुषांस** इतर बाह्य व्यवसायामुळें या गोष्टी स्वतः करण्यास फावत नाहीं. या करितां त्या करण्याचें जर **कुटुंबांतील सुशिक्षित स्त्रियांनीं** मनावर घेतलें तर त्यापासून फारच फायदा होईल.

**लहान मुलांस शाळेंत** पाठविण्यापेक्षां घरींच शिक्षण जर मिळेल तर त्यापासून पुष्कळ प्रकारचा फायदा होईल.

आलीकडे **पुरुषमंडळीनें** तर **'स्टाकिंग्स' 'बुट' ' पाट-लुनी'**, वगैरे पुष्कळ इंग्रजी पोषाखांचा सुकाळ केला आहे. व त्यांचें पाहून त्यांच्या **सुशिक्षित 'स्त्रियाही'** तसें करूं लागल्या आहेत. परंतु असें करण्याची आह्मांस तर कांहीं एक गरज दिसत नाहीं. जी पोषाखाची रीत आज हजारों वर्षां पासून आपले लोकांत आहे, ती आपले इकडील हवापाणी रीतरिवाज इत्यादिकांचे सोईस अनुसरून आहे. तींत आज फेरफार करण्याचें कारण काय?

**'बायकांनीं' स्टाकिंग्स, बूट अगर पोलके न घातल्यानें आजपर्यंत अडत होतें काय? पुरुष मंडळींस युरोपियनचरणसंपुष्ट घातल्या खेरीज कोणी राजद्वारीं येऊं देत नाहीं.** ह्या मुळें त्याणीं तेवढ्या पुरतें इंग्रजी **"शेल्यापागोट्याचें"** अनुकरण पाहिजे तर करावें. परंतु **स्त्रियांस** असें अनुकरण करण्याचें कांहीं एक कारण दिसत नाहीं. किती एक आमच्या **विद्वानांचें** ह्मणणें असें आहे कीं, आमच्या **स्त्रियांची** स्थिति फार वाईट आहे. त्यांना आह्मीं अगदी **गुलामा** प्रमाणें वागवितों. त्यांस कांहीं एक स्वतंत्रता नाहीं. ह्या करितां **युरोपियन** लोकांचें अनुकरण करून आपल्या **बायकांस** एकदम श्रेष्ठ पदवीस चढवून द्यावें. परंतु हें ह्मणणेंही युक्तीस व विचारास सरळ दिसत नाहीं.



आमच्यांतील रितीभाती सर्वच कांहीं वाईट व वेडगळ आहेत असें ह्मणण्याचें धाडस कोणाच्यानेंही करवणार नाहीं. मनुष्यमनुष्यांच्या स्वभावांत व वागणुकींत जसा फेरफार पडतो, तसाच देशोदेशींच्या रितीभातींत फरक पडतो. मग **सहा हजार** कोशांवरील **इंग्रज** लोकांच्या व आपल्या रितीभातींत साम्य कसें असेल? त्यांचा **देश** निराळा, **धर्म** निराळा, **हवापाणी** निराळें, त्याच प्रमाणें त्यांच्या वागणूकीच्या रिती भातीहि निराळ्या, यांत नवल ह्याचें? **हिंदुस्थान देशाची** रचना **इंग्लंडा** प्रमाणें [illegible] जाणें हें जितकें कठीण आहे, तितकेंच आपल्या **[illegible]कांच्या लुगड्यांच्या जागीं विलायती मडमांचे [illegible]गे उपयोगांत** आणणें हें दुरापस्त आहे. तर योग्य दिसेल व सोईस पडेल तेवढाच फेरफार करावा.

[ **भाग चवथा समाप्त.** ]

# सासुरवास--चंद्रिका.

भाग पांचवा.

## सासर आणि माहेर.

( कामदा. ) राग--अलैया बिलावल--ताल--धुमाळी.
" खेळ चांगला वेष धर बरे." ह्या चालीवर.

पारक्या गृहीं नित्य राहुनी ॥
मायबापतें सर्व सोडुनी ॥
इष्ट मैत्रिची विस्मृती पडे ॥
जाच सासुचा पाहुनी रडे॥ १ ॥
ना परी कधीं सोडिती गृहा ॥
सासुचे भयें दुःख तें अहा ॥
होति लाडक्या कन्यका जनां ॥
निंद्य कासया होति त्या सुना ॥ २ ॥
क्रूर शद्ब त बोलुनी तयां ॥
सासु जाचते डंकिणी बया ॥
कोणि बोलती नीट वागवा ॥
काय उत्तरा देति सासवा ॥ ३ ॥
हो उगी बसा काय बोलतां ॥
दोष ते इचे कां न पाहतां ॥
बैसुनी फुका खातसे किती ॥
काम ना करी नाहिं हो रिती ॥ ४ ॥
पारक्या मुली आणुनी घरा ॥



नित्य जाचिती प्रीति ना जरा ॥
मागुनी कशा ठेविती सुना ॥
मान सासुचा कांहिं राहिना ॥ ५ ॥

**आपला** सर्व **जन्म**, आपले **आईबाप, बहिणभाऊ,** यांस सोडून **आपल्या वंशांतला नव्हे, ओळखीचा नव्हे, आपला संबंधी नव्हे; असा भलताच पुरुष, त्याजबरोबर विध्युक्त विवाह लागून तीं स्त्रीपुरुषें एकमेकां विषयीं** वचन बद्ध झालीं ह्मणजे तीं एकमेकांचा जीव कीं प्राण होतात. तीच **स्त्री** आपल्या **पतीबरोबर श्वशुर गृहीं रममाण** होऊन तिचा दिवसानुदिवस आईबापांकडचा ओढा, **भावांबहिणीवरची प्रीति** आणि **माहेरच्या इष्टमित्रांचें संघट्टण** कमी कमी होत जाऊन तिला ओढलावणारीं प्रीतिपात्र आणि अत्यंत **संघट्टणाचीं** अशीं दुसरींच मनुष्यें ईश्वर तिजपासून निर्माण करितो. **पतिसाहचर्यानें** जी एवढीशी **मुलगी** असते, ती अल्पकालांतरानें मोठी थोरली लेंकुरवाळी **बायको** होऊन तिचा सर्व **ओढा, माया,** आणि **संघट्टण**, असें कायतें तिच्या **मुलां**कडे आणि **पति**समवेत असूं लागतें.

**मुलांला** जसें **पंतोजीच्या** हाताखालीं शाहणें व्हावें लागतें, तसें **मुलींना** आपले **"सासवेच्या"** हाताखालीं शहाणपण मिळवावयाचें असतें. **मुलांना** मायालावून त्यांस सुशिक्षण व सद्वर्तन लावणारा जसा **पंतोजी**, तशी

**मुलींवर** माया करून त्यांस **संसारांत दक्ष** व **सुशील** करणारी **सासु** आहे. तेव्हां **पंतोजींनीं** व **सासवांनीं**, हीं जीं आपल्या हाताखालीं दुसऱ्याचीं **मुलें** येतात; त्यांस हिडिस फिडिस करून, वाजवीपेक्षां फाजील **धाक** दाखवून त्यांस वाईट रितीनें वागवूं नये.

**वडिल माणसांनीं** व **सासवांनीं** आपल्या हाताखालीं वागण्यास आलेल्या ज्या **परक्यांच्या मुली** त्यांना चांगल्या रितीनें वागवाव्या.

**मुलीचें लग्न** उभें राहिलें ह्मणजे तिच्या **बापास** आपल्या **मुलीला नवरा** कसा मिळेल या विषयींची काळजी असते. **मुलीच्या आईला**, आपल्या **मुलीला नवरा** कसा मिळेल याची काळजी असून त्यापेक्षां तिला **सासू** कशी मिळेल याची फार चिंता करावी लागते. कारण **जांवई** कसाही व्रात्य, छांदिष्ट, दुर्गुणी असला तरी तो पुढें वयोधर्माप्रमाणें शाहणा होत जाण्याची आशा असते. व त्याचे हाताखालीं **मुलगी** वागूं लागण्यास पुष्कळ काळ जावयाचा असतो; परंतु **सासू** जर **खाष्ट, द्वाष्ट, आढ्यतेची, कजाग**, आणि **त्रासीक**, मिळाली तर तिच्या हाताखालीं वागणाऱ्या या अल्पवयी **मुलीची** फारदुर्दशा होऊन तिला फारच दुःखाचे दिवस जातात व यामुळें अशी **सासू** न मिळावी; याविषयीं **आयांचा** फार शोध असतो.



**ज्या आईनें सात आठ वर्षें मायेनें, लाडानें**, आणि अनेक **कौतुकें** पुरवून जिला वाढविली, जिचें **लालनपालन** केलें व जिला लहानाची मोठी केली, त्या पोटच्या गोळ्याला एका भलत्याच **बायकोच्या** हाता खालीं नेहमीं राहण्यास देण्याचा प्रसंग यावा तेव्हां तिच्या विषयीं तिणें शोध व काळजी वागविणें अवश्य आहे, **आया ज्या मुलींना सासू चांगली, सुस्वभावी, मायाळू** अशी मिळावी ह्मणून इच्छित असतात तें कांहीं वावगें नव्हे.

**दुसऱ्याच्या मुली** आपल्या हाताखालीं आल्यावर त्यांजवर प्रेम ठेवून त्यांशीं वात्सल्यानें वागणें व त्यांस आपण परकी आहों असें भासूं न देणें हें तर उत्तम **सासवेच्या सासूपणाचें** चिन्ह आहे.

**मुली** लहान असून वयांत येत तों पर्यंत **"सासवांच्या** हाताखालीं जो नांदण्याचा काळ तोच काय तो **आणिबाणीचा, आणि सासूपणाचें सद्यश संपादण्याचा असतो." सुना** मोठाल्या होऊन त्यांची आपल्या **नवऱ्यांशीं** ओळख झाली, ह्मणजे मग त्या **सासवेला** फारशा मोजीत नाहींत; आणि अशा वेळीं **सासवांनीं** ही आपल्या **सासूपणाचा** फारसा डौल मिरविण्याचे भरीस पडूं नये.

**सुना** लहान असतात तों पर्यंत **सासवा** त्यांना फारच **सासुरवास** करून गांजतात. परंतु त्याच **सुना** पुढें मोठ्या

होऊन कर्त्या सवरत्या झाल्या ह्मणजे त्या **सासवेच्या** उतार वयांत तिला जुमानीतनाशा होतात. यावरूनच आ- ह्मामध्यें **"दोन दिवस सासूचे व दोन दिवस सुनेचे"** अशी ह्मण पडली आहे. सारांश—असा कोणत्याही काळीं आपल्या **मुलां**कडून व **सुनां**कडून आपला अपमान न होईल अशा रितीनें त्यांशीं प्रेमानें वर्तन ठेवणें हें सर्व **संसारी स्त्रियांचें** काम आहे.

'**सासुरवास**' ह्मणजे **जाच, द्वाष्टपणा** व **हिडिस फिडिस, वसा खसा** इत्यादी करणें असा अर्थ चटकर लक्षांत येतो.

" **सासुरवास** " एवढाच शब्द घेतला तर " **सासरीं** राहणें ह्मणजे कांहीं मोठासा बिकटप्रसंग आहे असें नाहीं; परंतु **द्वाष्ट सासवांनीं** व **सासरच्या** मनुष्यांनीं त्या **सासुरवासाला** बिकट प्रसंगाच्या अर्थाचें रूप देऊन टाकिलें आहे.

" **जेथें** " **सासवासुना, नणंदाभावजया ह्या** एक विचारानें राहत असतील तें **घर** धन्य होय. आमच्या लोकांत सर्वत्र असें दृष्टीस पडेल कीं, **सासवा** ह्मणून ज्याअसावयाच्या, त्या बहुत करुन **द्वाष्ट, कजाग, जुलमी, मानी** आणि **बढाइखोर** अशाच असावयाच्या. युक्तीनें सांगून ममतेनें वागवून, होईल तितकेंच काम करवून, प्रसंगीं तिला करूं लागून आणि आपल्या अनुभवा प्रमाणें आपलें लहानपण



स्मरून **सुनांना** वागवून घेणाऱ्या **भाग्यशाली सासवा** फारच थोड्या मिळतील.

**हिडिस फिडिस** करावयाचें, **वसा खसा** करावयाच्या, वेळ, वखत, शक्ति, वय वगैरे न बघतां एखादें भारी काम करावयास सांगावयाचें, तोऱ्यानें बोलावयाचें आणि **"आह्मीं नव्हतों बाई सासूबाईचीं अशीं कधीं बोलणीं खात."** अशा बढाया झोंकणाऱ्या बायका बहुधा घरोघर सांपडतील.

**"या जगामध्यें हा एक सर्व साधारण प्रकार दिसतो कीं, बढाई मारल्या शिवाय कोणी सांपडत नाहीं."** त्यांत दोन हेतु असतात. आपला मान वाढावा व आपलें ऐकून ईर्षेनें दुसऱ्यांनीं चांगल्या स्थितीला यावें हीच गोष्ट असते.

**सासवेनें सुनेला** ह्मणावें, मीं तुझ्या एवढी होतें तेव्हां **सासूबाईचें** पुष्कळ काम करून त्यांचीं शाबासकी मिळवीत असें, पण तूं पहा आपली अठोळभारती पण ही **सासुबाई** आपल्या **सासूबाईच्या** तोंडून या **सूनबाईच्या** वयांत किती वेळां पुष्पपूजा पावली असेल याविषयीं साक्ष तिचें मनच तिला देत असतें. **बापानें मुलाला** ह्मणावें, **"काय बेत्या शंखा"** मी तुझ्या इतक्या वयांत पुष्कळ पाठ तयार केले; पण वास्तविक काय प्रकार असेल तो त्याचें मनच त्याला सांगत असेल. याच प्रकारें **गुरूनें** विद्या-

ध्यांस, धन्यानें चाकरांस, वडील भावानें धाकट्या भावांस, वडील बहिणीनें धाकट्या बहिणींस, वरच्या वर्गांतल्या विद्यार्थ्यानें खालच्या वर्गांतल्या विद्यार्थ्यांस येणें प्रमाणें बढाईची चाल परंपरा चालत आलेली सर्वांच्या पाहण्यांत आहे.

" **सासुरवास** " ह्मणजे एका **सासवेसच** लागत नाहीं. जेथें **द्वाष्टपणा, जाच, निर्दयता**, वाईट रितीची वागणूक वगैरे असेल त्यास **'सासुरवास'** ह्मणतात.

**सासवेनें सुनेस, नवऱ्यानें बायकोस, धन्यानें चाकरास, गुरूनें विद्यार्थ्यास** इत्यादि व्यक्तींमध्यें **सासुरवासाचा** प्रकार असतो.

"**सासुरवास** अनेक प्रकारचे असतात, एके ठिकाणीं **सासवेकडून सुनेला** असाच अतीशय **सासुरवास** होत होता, ह्मणून **आह्मीं समक्ष त्या सासवेला चार बोधाच्या गोष्टी सांगून, ममतेनें वागवून घेत जा ह्मणून सांगितलें. तों त्या कजाग" 'बाईनें'** आह्मांवरच एवढाले डोळे करून उत्तर दिले कीं, "**तुह्मी बसाहो गप्प. सुनांना अशाच वागविल्या पाहिजेत. आमच्या सासूबाई आह्माला अशाच वागवीत होत्या.**"

**सूनबाई** आपल्या **सासवेच्या** सांगण्या प्रमाणें वागण्यास व तिची मर्जी राखण्यास जरी चुकल्या नाहींत, तरी या **सासूबाईची** वागणूक निखालस तोऱ्याची.



कांहीं सांगावयाचें झालें कीं त्या बिचाऱ्या **सुनेच्या** अंगावर **वसकन** ओरडून काय सांगणें तें सांगतात, सर्वच **सासवा** अशा असतात असें नाहीं. कांहीं **सुनाही** अशाच **अचरट, गैरधोरणी, अजागळ, हट्टी, खुनशी, उद्धाणटप्पु, तोंडाळ, दांडग्या, उर्मट, तोंडासतोंड** देणाऱ्या, **सांगकाम्या, आळशी,** वगैरे दुर्गुणांनीं पूर्ण भरलेल्या असतात कीं, त्यांस **सासवांनीं** बोलल्या शिवाय परिणाम लागत नाहीं. परंतु हे दुर्गुण ह्मणजे त्यांच्या अंगीं बळकटसे खिळून राहिलेले नसतात. **बाळपणची बुद्धि** आणि **अजागळपणा** असल्यामुळें ममतेनें **बोधाच्या गोष्टी, उपदेशानें** [illegible]**क्याची जरब** दाखवून, फारसा जाच न करितां दुसऱ्या चांगल्या रितीचीं उदाहरणें दाखवून, **शेजारीं पाजारीं** या दुर्गुणांचा **बभ्रा** व **हकाटी** होऊं नये ह्मणून युक्तीनें घरांतल्या घरांत जर त्यांस शिकवितील तर फार बरें होईल.

**सुनांना** वागवितांना **सासवांनीं** त्यांजविषयीं **ममता, हौस, काळजी** आणि **शांति** धरली पाहिजे. **सुनेला** आपण परकी आहों अशा प्रकारचा धाक व जरब जितकी न ठेववेल तितकी बरी. आपल्या **मुलांशीं** व **मुलींशीं** जितक्या वत्सलतेनें वागतों, तितकी वत्सलता आपल्या **मुला**करितां ज्या दुसऱ्याच्या **'मुली'** आपला सर्व जन्म घालविण्यास आल्या आहेत, त्यांविषयींही आसावी. इतकी ममता

असली ह्मणजे याचे पोटांत **सासवांनीं सुनांला** वाटेल तसें वागवून घ्यावें.परंतु प्रथम पासूनच परकेपणा दाखवून **सासू** ह्मणजे बाऊ असें जें **सुनांनीं** मानण्या सारखें कित्येक **सासवांचें** वर्तन असतें तें सर्वथैव निंद्य आहे.

आपण कोठें कधीं तरी असें ऐकिलें आहे काय; कीं, अमुक **आई** आपल्या **मुलीस** फारच जाच करते ह्मणून? कोठेंही नाहीं. **सासवा** फक्त आपल्या **मुलीं** विषयीं किती मायाळू असून **सुनांविषयीं** किती **बेपर्वा** असतात. याचीं उदाहरणें प्रत्येक ठिकाणीं शेंकडों सांपडतील. एकाच काळीं एकच काम **सुनेला** व **मुलीला** सांगणें असल्यास **सुनेला** तें एका प्रकारच्या निराळ्याच स्वरानें व हुकुमानें सांगून लागलेंच **मुलीला** त्याच शद्बांनीं; परंतु त्यांत ममता दाखवून जरा खालच्या स्वरांत सांगावयाचें.

**हे सुनेला सांगण्याचे शद्ब किती कठोर आहेत पहा.** अग "**गंगा** अंग धुवून **लुडकें** खळबळून लौकर ये आणि **खायचं** असलं तर खाऊन घे" हें तोऱ्यानें व एक प्रकारचें वजन ठेवून **सासवेनें सुनेला** सांगावयाचें, व हेंच काम **मुलीला सांगते वेळीं किती मधुर शब्द निघतात बरें!** "**मनुबाई** लौकर लौकर अंग धुवून ये आणि **साडी दे गंगाकडे** नी तूं थोडासा फराळ कर अँ?" असें सांगावयाचें. या दोन प्रकारच्या सांगण्यांत किती फेर आहे तो वाचकांस कळेलच. बरें अशा प्रकारचें सांगणें,